रायगड, नवी मुंबई
**राम प्रहर**
◆ वर्ष १८ ◆ अंक ३३१
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १९ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## विधान परिषदेसाठी शांततेत मतदान, सोमवारी मतमोजणी



**मुंबई :** राज्यात एकीकडे उबाठा गटाच्या खासदार फुटीवरून प्रचंड गदारोळ सुरू असतानाच दुसरीकडे विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांसाठी गुरुवारी (दि. १८) शांततापूर्ण मतदान पार पडले. राज्यातील एकूण १७ जागांपैकी ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, पुणे आणि अहिल्यानगर या सहा जागांवर महायुतीचे उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे उर्वरित ११ जागांसाठी ही मतदान प्रक्रिया राबवण्यात आली. यामध्ये नाशिक आणि भंडारा-गोंदिया मतदारसंघांत मतदारांनी १०० टक्के मतदानाचा हक्क बजावला. गुरुवारी दुपारी ४ वाजता मतदान संपल्यानंतर सर्व मतपेट्या स्ट्राँग रूमकडे रवाना करण्यात आल्या असून येत्या सोमवारी म्हणजेच २२ जून रोजी या निवडणुकीची मतमोजणी होऊन चित्र स्पष्ट होणार आहे.


### अंतरंग

- वादळाने पडलेला विद्युत खांब अखेर केला बाजूला/२
- बेकायदेशीर पिस्तूल, काडतुसे बाळगणाऱ्याला अटक/५
- भारतीय हॉकी संघाची उपांत्य फेरीत धडक/८


# ‘उबाठा’तील फुटीवर शिक्कामोर्तब

## व्हीप धुडकावून सहा खासदार बैठकीला गैरहजर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने गुरुवारी (दि.१८) संसदीय कार्यालयात बोलावलेल्या बैठकीस फुटीर सहा खासदार गैरहजर राहिले. पक्षाकडून जारी करण्यात आलेल्या व्हीपनंतरही हे खासदार बैठकीस अनुपस्थित राहिल्याने ‘उबाठा’तील फुटीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

बैठकीदरम्यान राज्यसभेतील खासदार संजय राऊत तसेच लोकसभेतील खासदार अनिल देसाई, अरविंद सावंत आणि राजाभाऊ वाजे इतकेच जण उपस्थित होते, तर इतर खासदार संजय पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाघचौरे आणि नागेश पाटील-आष्टीकर बैठकीस गैरहजर राहिले.

स्वतंत्र गट स्थापन करण्याच्या अगोदरच लोकसभा अध्यक्षांकडे अर्ज केल्याने व्हीप लागू होत नसल्याचा दावा सहा खासदारांकडून करण्यात आला होता. त्यांच्या स्वतंत्र गटाला मंजुरी मिळाल्याने त्यांचा शिंदे सेनेतील विलीनीकरणाचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे. याबाबतची घोषणा शिवसेनेच्या वर्धापन दिनी म्हणजेच शुक्रवारी (दि.१९) केली जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, ठाकरे सेनेने या सहा फुटीर खासदारांविरोधात कारवाईचा इशारा दिला आहे, मात्र फुटीर खासदारांची संख्या दोन तृतीयांश म्हणजेच आवश्यक संख्याबळापेक्षा जास्त असल्यामुळे ठाकरे गटाला कायदेशीर लढाईत यश मिळणे कठीण असल्याचे कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### ...म्हणून घेतला मोठा निर्णय

ठाकरे सेनेच्या सहा खासदारांनी पक्षाची साथ नेमकी का सोडली याचे कारण समोर आले आहे. या खासदारांनी आपला पक्ष थेट काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा वरिष्ठ नेत्यांचा प्लॅन होता म्हणूनच आम्ही ठाकरेंची शिवसेना सोडण्याचा निर्णय घेतल्याचा खळबळजनक दावा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिलेल्या पत्रात केला आहे. हा प्लॅन आम्हाला मान्य नसून आम्ही सहा खासदार आता शिवसेना शिंदे गटात विलीन होत आहोत. त्यामुळे लोकसभेत आमची बसण्याची जागा बदलून ती शिंदे गटाच्या खासदारांसोबत करण्यात यावी, अशी विनंतीही या पत्राद्वारे करण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे.

## रेल्वे मालवाहतुकीला मिळणार नवा वेग!

■ सोमाटणे-चिखले कॉर्ड लाइन प्रकल्पाला मंजुरी



**मुंबई : प्रतिनिधी**


महाराष्ट्रातील रेल्वे पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी आणि देशाच्या मालवाहतूक व्यवस्थेला अधिक गतिमान करण्याच्या दिशेने भारतीय रेल्वेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मध्य रेल्वेच्या ३.७ किलोमीटर लांबीच्या सोमाटणे-चिखले कॉर्ड लाइन प्रकल्पाला १७२ कोटींची मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पनवेल जंक्शनवरील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

सध्या कर्जत मार्गावरून रोह्याच्या दिशेने जाणाऱ्या मालगाड्यांना पनवेल जंक्शनमध्ये प्रवेश करून इंजिनची दिशा बदलावी लागते. यामुळे वेळेचा मोठा अपव्यय होतो तसेच जंक्शनवरील गर्दीतही भर पडते. नव्या कॉर्ड लाइनमुळे चिखले (कर्जत मार्ग) आणि सोमाटणे (रोहा मार्ग) यांना थेट जोडणी मिळणार असून मालगाड्यांना पनवेलमध्ये प्रवेश न करता सरळ मार्ग उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पामुळे प्रत्येक मालगाडीचा सुमारे ११० मिनिटांचा विलंब टळणार असून मालवाहतुकीची गती लक्षणीयरीत्या वाढेल. देशातील सर्वांत महत्त्वाच्या कंटेनर बंदरांपैकी एक असलेल्या जेएनपीए मार्गावरील वाहतुकीला याचा थेट लाभ मिळणार आहे तसेच या मार्गामुळे दरवर्षी अतिरिक्त नऊ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळणे शक्य होणार आहे.

पनवेल एलिव्हेटेड कॉर्ड लाइनसह एकात्मिक नियोजनाचा भाग असलेला हा प्रकल्प पश्चिम भारतातील रेल्वे मालवाहतूक नेटवर्क अधिक सक्षम आणि कार्यक्षम बनवणार आहे. परिणामी मालवाहतुकीसह प्रवासी रेल्वे सेवांचे नियोजनही अधिक सुरळीत होण्यास मदत मिळणार आहे. भारतीय रेल्वेच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील औद्योगिक आणि बंदर आधारित अर्थव्यवस्थेला नवी गती मिळणार असून देशाच्या लॉजिस्टिक क्षमतेतही मोलाची वाढ होणार आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर



**कोल्हापूर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून १९ आणि २० जून रोजी ते कोल्हापूरचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते करवीर निवासिनी अंबाबाई मंदिर परिसरातील विकास आराखड्यांतर्गत पूर्ण झालेल्या विकासकामांचे उद्घाटन आणि निर्माणाधीन प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करतील.

१९ जून रोजी अंबाबाई मंदिर परिसराच्या सौंदर्यीकरण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण गृहमंत्र्यांच्या हस्ते होईल. कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराचा कायापालट करण्यासाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विशेष विकास आराखडा राबवला जात आहे. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच २० जून रोजी विकासकामांची पाहणी आणि अधिकृत कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर गृहमंत्री शाह यांची भव्य जाहीर सभा कोल्हापुरात होणार आहे.

## संसदीय संकुल विकास परियोजनेचा विस्तार वाढवणार -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

देशात सात राज्यांमध्ये ज्ञान भागीदार म्हणून योजक संस्थेच्या सहयोगाने संसदीय संकुल विकास परियोजना राबवण्यात येते. जनजातीय आणि दुर्गम भागांतील सर्वांगीण विकासामध्ये संसदीय संकुल उपक्रमाला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळत आहे. या परियोजनेचा विस्तार विधानसभा क्षेत्रापर्यंत वाढविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय संकुल विकास परियोजनेची



महाराष्ट्रातील स्थितीसंदर्भात आढावा बैठक झाली. या बैठकीस माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, खासदार डॉ. हेमंत सावरा, माजी खासदार हिना गावीत, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास विभाग सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, सेवावर्धिनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश देगावकर डॉ. गजानन डांगे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ग्रामीण भागात शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, स्थानिक कामाच्या अभावाने निर्माण होणारे स्थलांतर थांबवणे आणि शासनाच्या योजनांची समन्वय करून प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या परियोजनेचा विस्तार विधानसभा क्षेत्रामध्ये वाढवणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसह शेती, सिंचन, रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास आणि जीवनमान उंचावणाऱ्या विविध योजनांचा लाभ या भागांतील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहचवण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील १० ते २० गावांचा समावेश करून त्याचा समूह तयार करावा. महिलांचे सक्षमीकरण, दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी वृक्षलागवड, जलसंधारण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, युवकांसाठी बाजारपेठ व कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या उपक्रमासाठी विविध विभागांच्या समन्वयासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### निवडक

#### उच्चशिक्षित तरुणीवर भोंदूबाबाकडून अत्याचार

**पुणे :** आपण परमेश्वराचा अवतार असल्याचे सांगत एका भोंदूबाबाने २६ वर्षीय उच्चशिक्षित तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. राधामोहन मिश्रा (५९) असे या नराधम बाबाचे नाव असून तो व त्याचा साथीदार स्वामी कंवल नयन (५७) याच्यासह सहा महिलांना खराडी पोलिसांनी अटक केली आहे. हा प्रकार २००१ ते २०२६ दरम्यानच्या कालावधीत हरियाणा आणि पुणे परिसरात घडला. वाघोलीजवळील उबाळेनगर परिसरात मिश्राबाबाच्या आश्रमात लॅपटॉप, मोबाइल, हार्ड डिस्क, कॅसेट, पेन ड्राइव्ह, जिवंत काडतुसे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून मेडिकलसंबंधित गोळ्याही आढळल्यात.

#### लोहगडावरून पडून ट्रेकिंगला गेलेल्या तरुणाचा मृत्यू

**मावळ :** लोहगडावर ट्रेकिंगला आलेल्या तरुणाचा छायाचित्रासाठी पोझ देताना तोल गेल्याने कड्यावरून दरीत पडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि.१८) घडली. केतन विशाल अग्रवाल (वय २६, रा. गहुंजे, मावळ) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. होणारी पत्नीचा यावेळी त्याच्यासोबत होती. अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या लग्नाची गाठ बांधण्यापूर्वीच या तरुणाला मृत्यूने गाठले.

#### पीएम किसान योजनेचा निधी उद्या होणार जमा

**नवी दिल्ली :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना २३व्या हप्त्याचे वितरण २० जून रोजी केले जाणार आहे. पश्चिम बंगालमधील हुगळी (तारकेश्वर) येथे आयोजित किसान सन्मान संमेलनातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात हा निधी थेट जमा केला जाईल.

## श्रीवर्धन प्रांत कार्यालयातील दोन लाचखोर कर्मचारी अटकेत

**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**

एका शेतकऱ्याला आपल्या सातबारा उताऱ्यातील दुरूस्ती करून देण्यासाठी लाच घेणाऱ्या श्रीवर्धन प्रांत कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली. अव्वल कारकून नितीन पवार व शिपाई सचिन पाटील अशी जेरबंद केलेल्या लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, म्हसळा तालुक्यातील पाभरे येथील एक शेतकरी आपल्या सातबारा उताऱ्यातील दुरूस्तीसाठी मागील अनेक दिवसांपासून श्रीवर्धन येथील प्रांत कार्यालयात फेऱ्या मारत होता, मात्र अनेक चकरा मारूनसुद्धा त्याचे काम होत नव्हते. अखेर तेथील कर्मचाऱ्याने हे काम करण्यासाठी ६० हजार रुपयांची लाच शेतकऱ्याकडे मागितली होती. लाचेचा पहिला ३० हजारांचा हप्ता देण्यासाठी हा शेतकरी बुधवारी प्रांत कार्यालयात आला होता. तत्पूर्वी त्याने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड-अलिबाग येथील पथकाने सापळा रचला. यावेळी लाचखोर अव्वल कारकून नितीन पवार आणि शिपाई सचिन पाटील यांना लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली. याबाबत रात्री उशिरापर्यंत श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

याअगोदर श्रीवर्धन तहसील कार्यालयातील एका कारकुनावर नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करण्याची घटना घडली होती. प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्या हाताखालील कर्मचारी जर का जनतेकडे अशा प्रकारे लाचेची मागणी करीत असतील, तर अधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा वचक राहिलेला नाही हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे कोकण आयुक्त नवी मुंबई यांनी याप्रकरणी योग्य लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी जनतेमधून केली जात आहे.

## पनवेल महापालिकेच्या फॉग कॅनन वाहनांचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वायू प्रदूषण आणि धूळकणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पनवेल महापालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून अत्याधुनिक फॉग कॅनन वाहनांचे महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सदस्य नगरसेवक परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी उद्घाटन करण्यात आले.

पनवेल महापालिका मुख्यालय येथील छत्रपती संभाजी महाराज मैदानात झालेल्या या कार्यक्रमास उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक विकास घरत, अजय बहिरा, अमर पाटील, सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, नगरसेविका सरस्वती काथारा, उपायुक्त स्वरूप खारगे, पर्यावरण विभागप्रमुख मनोज चव्हाण उपस्थित होते.

महापालिकेने याआधी चार फॉग कॅनन वाहने नागरिकांच्या सेवेत दाखल केली आहेत. आता आणखी चार वाहने या मालिकेत सहभागी केली आहेत. यामुळे महापालिका कार्यक्षेत्रातील वायू प्रदूषण आणि धूळकणांवर नियंत्रण मिळवणे सोपे जाणार आहे. ही वाहने उच्च दाबाने सूक्ष्म पाण्याची फवारणी करून हवेत तरंगणारे धूळकण आणि प्रदूषणकारी घटक कमी करण्याचे कार्य करणार आहेत. वाढते शहरीकरण, बांधकामे आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता ही यंत्रणा प्रभावी ठरणार आहे.

या वाहनांमध्ये आधुनिक आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक सुधारण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. विशेषतः खारघर, कळंबोली, कामोठे, पनवेल, खांदा कॉलनी, पनवेल परिसरातील मुख्य रस्ते व बांधकाम क्षेत्रांमध्ये या वाहनांचा वापर होईल.

या उपक्रमामुळे हवेतील सूक्ष्म धूळकणांचे प्रमाण कमी होऊन अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि निरोगी वातावरण उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास आयुक्त मंगेश चितळे यांनी व्यक्त केला आहे. शहराच्या पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## नवी मुंबई विमानतळावरून १५ जुलैपासून आंतरराष्ट्रीय सेवा

**मुंबई : प्रतिनिधी**


जगातील सर्वांत सुंदर विमानतळांच्या यादीत नाव आल्यानंतर आता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा लवकरच विस्तार होणार आहे. १५ जुलैपासून या विमानतळावरून आंतरराष्ट्रीय प्रवाशांची आणि मालवाहतूक सुरू होणार आहे. यामुळे मुंबई महानगर प्रदेशात आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी आणखी एक पर्याय उपलब्ध होणार आहे.



नवी मुंबई विमानतळावर डिसेंबर २०२५मध्ये उड्डाणांना सुरुवात झाली. त्यानंतर हळूहळू विमानतळावर २४ तास सेवा सुरू करण्यात आली. आता येथील विमानतळावरून प्रथम आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीला सुरुवात होणार असून नंतर ठरावीक प्रवासी उड्डाणे हाताळली जातील, अशी माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लि.चे सीईओ बी.व्ही.जे.के. शर्मा यांनी दिली. याशिवाय या विमानतळावर दुसऱ्या टर्मिनलचा विस्तारसुद्धा होणार असल्याचे त्यांनी मुंबईतील बीसीबीए लॉजिस्टिक कॉन्क्लेव्हमध्ये बोलताना सांगितले. (सविस्तर पान ६ वर..)



**खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाट परिसरातील आडोशी बोगद्याजवळ सुमारे १०० फूट उंचीवर पाच टन वजनाचा दगड संरक्षण जाळीत अडकून राहिल्याचे निदर्शनास आले होते. गंभीर अपघाताची शक्यता लक्षात घेऊन महामार्ग पोलीस केंद्राने यंत्रणांशी समन्वय साधून हा दगड सुरक्षितपणे तेथून हटविला. (वृत्त पान ७ वर..)

# बालकांना पोषणासह चविष्ट आहार

## घरपोच आहारात नव्या पाककृतींचा होणार समावेश –मंत्री आदिती तटकरे

**मुंबई : प्रतिनिधी**

अंगणवाडीतील बालकांसह गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारामध्ये पोषणमूल्यांसोबतच चवीलाही प्राधान्य देत नवीन आणि रुचकर पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत राज्यातील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारासंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मंत्री तटकरे यांनी स्वतः पोषण आहाराच्या गुणवत्तेची तपासणी केली. बैठकीस महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख, आयुक्त डॉ. जगदीश मणियार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), सहसचिव वी. आर. ठाकूर, अवर सचिव सुनील सरदार, प्रसाद कुलकर्णी, सह आयुक्त वर्षा पवार, उपायुक्त संगीता लोंढे, विजय क्षीरसागर, जामसिंग गिरासे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, केंद्र शासनाच्या निकषानुसार सध्या घरपोच आहार प्रीमिक्स स्वरूपात वितरित केला जातो. मात्र, लाभार्थ्यांकडून मिळालेला प्रतिसाद, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या सूचना तसेच तज्ज्ञांच्या शिफारशी लक्षात घेऊन या आहारामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत.

सध्याच्या 'एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स'मधील घटकांच्या मिश्रणात सुधारणा करण्यात आली असून आहाराचा दर्जा अधिक चांगला राखण्यासाठी मसाल्याचे पाकीट स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय 'मल्टी मिक्स सिरियल्स अँड प्रोटीन्स' ही पाककृती कायम ठेवण्यात आली आहे. तसेच 'व्हेज पुलाव' आणि 'मल्टीग्रेन पफ' या दोन नवीन पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे.

या बदलांमुळे लाभार्थ्यांना आता अधिक पौष्टिक आणि रुचकर पाककृतींचा घरपोच आहार उपलब्ध होणार आहे. सर्व पाककृतींमध्ये केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणात उष्मांक, प्रथिने आणि आवश्यक सूक्ष्म पोषकतत्त्वांचा (मायक्रोन्यूट्रिएंट्स) समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी शासन सातत्याने विविध उपाययोजना राबवत असून मागील तीन वर्षांत कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे. नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या पाककृतींमुळे लाभार्थ्यांची आहाराबाबतची स्वीकृती वाढेल आणि कुपोषण कमी करण्याच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आहाराबाबत माहिती देताना डॉ. अनुपकुमार यादव म्हणाले की, आहारामध्ये बदल करण्यापूर्वी राज्यभर सर्वेक्षण करण्यात आले. तसेच वैद्यकीय अधिकारी, आहारतज्ज्ञ आणि विविध विशेषज्ञ संस्थांची मते जाणून घेण्यात आली. क्षेत्रीय यंत्रणांशी झालेल्या चर्चेदरम्यान या नवीन पाककृतींना लाभार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळेल.





**पेण : नवनिर्वाचित कोकण विभाग विधान परिषद सदस्य अनिकेत तटकरे यांनी राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांची वाक्रुळ येथील स्नेहसागर येथे निवास्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य नीलिमा पाटील, पंचायत समितीचे उपसभापती संजय डगर, गटनेते विवेक म्हात्रे तसेच पंचायत समिती सदस्य उपस्थित होते.**

## नीट परीक्षार्थींच्या सोयीसाठी २१ जूनला मध्य रेल्वेवर कोणताही मेगाब्लॉक नाही

**रोहा : प्रतिनिधी**

नीट यूजी २०२६ परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी, मध्य रेल्वेने रविवारी २१ जून रोजी कोणताही मेगाब्लॉक न घेण्याचा निर्णय घेतला आहे. २१ जून २०२६ रोजी रविवारचे विशेष वेळापत्रक लागू राहणार नाही

मध्य रेल्वे रविवार २१ जून रोजी सर्व मार्गांवर उपनगरीय रेल्वेच्या सर्व १८२० सेवा नियमित वेळापत्रकानुसार चालविणार येणार आहे. सामान्यतः रविवारी १२०० सेवा चालवल्या जातात.

यामुळे रेल्वे सेवा सुरळीत आणि विनाअडथळा सुरू राहील आणि नीट यूजी २०२६ परीक्षेला बसणारे मोठ्या संख्येतील उमेदवार व त्यांचे पालक कोणत्याही गैरसोयीशिवाय वेळेवर परीक्षा केंद्रांवर पोहचू शकतील.

## बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाईचा सकारात्मक परिणाम

### प्रतिदिन उत्पन्न तीन कोटी रुपयांनी वाढले

**मुंबई : प्रतिनिधी**

परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या सूचनेनुसार आणि तत्कालीन औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करत राज्यभरातील बसस्थानकांच्या २०० मीटर परिघातील अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्रीमती प्रियांका नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला उल्लेखनीय यश मिळाले असून त्याचा थेट सकारात्मक परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर दिसून आला आहे. १ जून ते १५जून २०२६या कालावधीत एसटी महामंडळाचे एकूण वाहतूक उत्पन्न४९५ ,कोटी ३४ लाख रुपये इतके झाले असून, मागील वर्षीच्या याच कालावधीतील४५१, कोटी ५१ लाख रुपयांच्या तुलनेत ४३ कोटी ८३ लाख रुपयांची (९.७१टक्के) वाढ नोंदविण्यात आली आहे. म्हणजे दररोज चे सरासरी उत्पन्न ३ कोटी रुपयांनी वाढले आहे.

या कालावधीत रायगड (२ कोटी १७ लाख), पुणे (५ कोटी ९७ लाख), सातारा (३ कोटी ४६ लाख), छत्रपती संभाजीनगर (२ कोटी ६६ लाख), अमरावती (१ कोटी ६० लाख) नांदेड (३ कोटी २७ लाख) या विभागांनी सर्वाधिक उत्पन्नवाढ नोंदवली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि महसुलावर मोठा परिणाम होत होता. न्यायालयाच्या आदेशानुसार बसस्थानकापासून २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. परिवहन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस आणि एसटी प्रशासन यांच्या संयुक्त कारवाईमुळे प्रवाशांचा एसटीकडे ओढा वाढला असून त्याचे प्रतिबिंब उत्पन्नवाढीत स्पष्टपणे दिसून येत आहे

सरनाईक यांनी पुढे सांगितले की, राज्यातील प्रत्येक बसस्थानक परिसर अवैध प्रवासी वाहतुकीपासून मुक्त करण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून, एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील. प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य आहे.

## नवी मुंबईत साकारली अत्याधुनिक 'मॉड्युलर मानवी दूध बँक'

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बालकाचया सुदृढ आयुष्यासाठी आणि निरोगी आरोग्यासाठी आईचे दूध हेच अमृत आहे. आईच्या दुधामुळे बालकाची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि भविष्यातील अनेक आजारांपासून त्याचे रक्षण होते. आईच्या दुधाचे हेच अनन्यसाधारण महत्त्व ओळखून, आमदार मंदा म्हात्रे यांच्या दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी येथील रुग्णालयामध्ये पहिली अत्याधुनिक 'मॉड्युलर मानवी दूध बँक' यशस्वीपणे साकारली आहे.

आईच्या दुधापासून वंचित राहणाऱ्या नवजात बालकांची होणारी परवड जवळून पाहिली होती. कोणतही बाळ या अमृतापासून वंचित राहू नये, या संवेदनशील विचाराने त्यांनी या प्रकल्पाचा ध्यास घेतला होता.

या संदर्भात बोलताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या, "आईचे दूध हे नवजात बालकासाठी निसर्गाचे सर्वात मोठे वरदान आहे. अनेकदा काही वैद्यकीय कारणांमुळे आजारी बाळांना आईचे दूध मिळू शकत नाही, अशा वेळी ही मानवी दूध बँक त्या बालकांसाठी सुरक्षा कवच बनेल.



## घटती पटसंख्या रोखण्याचे लक्ष्य; आता अधिकारी शाळा दत्तक घेणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि घटती पटसंख्या रोखण्यासाठी शिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता शिक्षण विभागातील वर्ग १ आणि वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना वर्षभरासाठी जिल्ह्यातील शाळा दत्तक आणि शाळांचा कायापालट करण्याची थेट जबाबदारी आता अधिकाऱ्यांच्या खांद्यावर आली आहे.

रायगड जिल्ह्यात गेल्या काही वर्षात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या लक्षणीयरीत्या घटल्याचे समोर आले आहे. शासनाकडून मोफत पाठपुस्तके, गणवेश आणि इतर सोयीसुविधा पुरवल्या जात असूनही विद्यार्थ्यांची गळती सुरूच आहे. या पार्श्वभूमीवर शाळांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी वर्षभर विविध कृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

अधिकाऱ्यांना केवळ अहवाल मागवून चालणार नाही, तर दत्तक शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांना थेट मार्गदर्शन करावे लागणार आहे.

दत्तक घेणाऱ्या अधिकाऱ्यांना नवीन शैक्षणिक वर्षात पटसंख्या वाढवण्याचे 'टार्गेट' दिले जाणार आहे. परिसरातील एकही बालक शिक्षणापासून वंचित राहणार नाही आणि शाळेतील गळतीचे प्रमाण शून्य होईल, यावर अधिकाऱ्यांना काम करावे लागेल. जिल्हा परिषद आणि शासकीय शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, मोफत पाठपुस्तके आणि इतर अनेक सोयी–सुविधा दिल्या जातात. तरीही इंग्रजी माध्यमांच्या क्रेझमुळे पटसंख्या घटत असल्याने आता अधिकारी स्वतः मैदानात उतरणार आहेत.

केवळ कागदावर शाळा दत्तक घेऊन चालणार नाही, तर अधिकाऱ्यांना वर्षभरात वेळोवेळी या शाळांना प्रत्यक्ष भेटी द्याव्या लागतील. भेटीदरम्यान शालेय व्यवस्थापन समितीशी संवाद साधून भौतिक सुविधांचा आढावा घ्यावा लागणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांची घटणारी विद्यार्थी संख्येवर रोख लावण्याचा हा प्रयत्न आहे.

शाळा दत्तक घेण्याच्या या मोहिमेत शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी आणि विस्तार अधिकारी या वर्ग १ व वर्ग २ च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट समावेश करण्यात आला आहे. याशिवाय महसूल विभागातील अधिकारयांवर देखील याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# पोलिओमुक्त रायगडसाठी जिल्ह्यात लसीकरण मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवार (दि. २८) रोजी रायगड जिल्ह्यात लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण १ लाख ८९ हजार २७ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासंबंधीची बैठक बुधवारी (दि.१७) उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या.

रायगड जिल्ह्यात २८ जून रोजी पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात येणार असून, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्रे, अंगणवाडी केंद्रे तसेच इतर निश्चित ठिकाणी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत लसीकरणाची सुविधा उपलब्ध असणार आहे. कोणताही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना लस देणार आहेत.

याचप्रमाणे स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे, याबाबत बैठकीत माहिती देण्यात आली. बैठकीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर, आरोग्य विभागाच्या जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेश्मा संकपाळ यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला जवळच्या पल्स पोलिओ बूथवर घेऊन जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत आणि पोलिओमुक्त रायगड घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, राजिप उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर यांनी केले आहे.

नियमित लसीकरण झालेले असले तरी प्रत्येक बालकाला पल्स पोलिओ लसीचे दोन थेंब देणे आवश्यक आहे. मोहिमेच्या पहिल्या दिवशी बूथवर लसीकरण केल्यानंतर पुढील टप्प्यात आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना लस देणार आहेत स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

माध्यमिक विद्यालय विवेकानंद संकुल, सानपाडा येथे गुरुवार दिनांक १८ जून२०२५ रोजी माध्यमिक शाळांत परीक्षेतील गुणवंतांचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी सानपाडा प्रभागातील सुनील कुरकुटे यांच्या पत्नी व सामाजिक कार्यकर्त्या नम्रता कुरकुटे तसेच विज्ञान विषयासंदर्भात अनेक संस्थांमध्ये कार्यरत असणारे व चिकित्सक समूह शिरोडकर विद्यालयाचे माजी शिक्षक कैलास चव्हाण उपस्थित होते. नगरसेवक सुनील करकुटे यांच्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांना बॅग, छत्री व वह्या बक्षीस स्वरूपात देण्यात आल्या. तसेच इयत्ता आठवी ते दहावी मधील काही गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटपही या कार्यक्रमात करण्यात आले. नम्रता कुरकुटे यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या व सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन केले.



## वादळाने पडलेला विद्युत खांब अखेर काढला बाजूला

**चौक : प्रतिनिधी**

८ मे रोजी आलेल्या वादळात मोरबे धरणग्रस्त वसाहतीच्या ठिकाणी विद्युत खांब आडवा पडला होता.एक महिना पूर्ण होत असताना देखील तो दूर केला नव्हता, ८ जून रोजी लोकप्रिय दैनिक रामप्रहर याने यावर प्रकाश टाकला आणि त्याची ९ जून रोजी पाहणी होऊन आज तो काढून टाकण्यात येत आहे.



मोरबे धरणग्रस्त असलेल्या कर्जत–चौक रस्त्यावरील मोरबे गावात ८ मे रोजी वादळ आणि पावसाने थैमान घातले होते. वावंढळ गावापासून अनेकांची घर ते विद्युत् खांब व वाहिन्या यांचे मोठे नुकसान झाले. तीन दिवसांनी या परिसरात वीजपुरवठा सुरू झाला होता, मात्र मोरबे गावात आडवा झालेला विद्युत खांब एक महिन्या नंतर तसाच होता, याबाबत सामाजिक कार्यकर्ते मिलिंद राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दाखवले होते.

याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मिलिंद राणे यांच्या सोबत धनंजय जयराम राणे, संदेश हनुमंत राणे, किरण गजानन राणे यांनीही पाठपुरावा केला होता.८ जून रोजी दैनिक राम प्रहर मध्ये बातमी प्रसिद्ध झाल्यावर वरिष्ठ अधिकारी यांनी पाहणी केली होती.

मंडळाचे अधिकारी व स्थानिक कर्मचारी यांची भेट घेऊन त्यांना परिस्थिती सांगितली, पण एक महिना झाला तरी ना अधिकारी, ना कर्मचारी फिरकला. हा विद्युत खांब रस्त्यावर आडवा पडला असल्याने रहदारीला अडचण निर्माण होते. गाडी जात नसल्याने एक तर फिरून जावे लागते अथवा गाडी उभी करून पुढे जावे लागत होते. दैनिक रामप्रहर यांचे मिलिंद राणे यांनी आभार व्यक्त केले आहेत. आज हायड्रा, गॅस कटर, मजूर यांच्या सहाय्याने विद्युत खांब काढल्याने नागरिकांच्या मनातील भीती दूर झाली, असेही मिलिंद राणे यांनी म्हटले आहे

### दुखवटा

**मोहिनी निकाळजे**



**चौक :** ग्रुप ग्रामपंचायत लोधीवलीच्या माजी उपसरपंच मोहिनी किशोर निकाळजे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. अत्यंत धडाडीचे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे, आंबेडकरी विचाराने त्या भारावलेल्या होत्या. त्यांचे तेरावे विधी मौजे वरोसे तालुका खालापूर येथे २५ जून रोजी होणार आहेत.

# मान्सूनपूर्व कामांची महापौरांकडून पाहणी





## कामे वेळेत पूर्ण करण्याचे आदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळा तोंडावर आल्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मान्सूनपूर्व कामांना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी महापालिकेचे अधिकारी आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसमवेत गुरुवारी (दि. १८) शहरातील विविध भागांचा दौरा करीत सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांनी नावडे आणि पेठ गाव परिसराला भेट दिली. येथील गटारे, नाल्यांची सफाई, रस्त्यांची दुरुस्ती यांसह इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या कामांची त्यांनी सविस्तर पाहणी केली आणि सद्यस्थितीचा आढावा घेतला. पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी ही सर्व कामे दर्जेदार पद्धतीने आणि लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी नगरसेवक दिनेश खानावकर यांच्यासह भाजपचे स्थानिक पदाधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा कामगार आघाडीचे संयोजक रवी नाईक यांनी वाढदिवसानिमित्त गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. भाजप प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनीही रवी नाईक यांना पुस्तक भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, माजी नगरसेवक अजय बहिरा, रवी जोशी यांच्यासह कामगार आघाडीचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील, हरेश्वर पोळेकर, माधवराव खेरडे, विनायक मुंबईकर, सरचिटणीस मोतीलाल कोळी, चिटणीस रवींद्र कोरडे, जगदिश गायकर, खजिनदार जगदिश म्हात्रे, सहखजिनदार उपेंद्र मराठे, कार्यालयीन सचिव मधुकर उरणकर, प्रसिद्धीप्रमुख राजपाल शेगोकार, वंदे मातरम् जनरल कामगार संघटनेचे सरचिटणीस जितेंद्र तिवारी, पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी यांनीही नाईक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# इन्फिनिटी फाउंडेशनतर्फे 'बुक मेहफिल'ची यशस्वी सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाचन संस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशाने इन्फिनिटी फाउंडेशनच्या वतीने 'बुक मेहफिल' उपक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये २० स्पर्धकांनी सहभाग घेत विविध पुस्तकांचे वाचन करून त्यावरील आपली मते, पुस्तकातून मिळालेली जीवनमूल्ये तसेच त्या पुस्तकांच्या माध्यमातून त्यांच्या आयुष्यात घडलेले सकारात्मक बदल याविषयी मनोगत व्यक्त केले.

पुस्तकांमधून मिळणारे ज्ञान, प्रेरणा आणि वैयक्तिक विकासातील त्यांचे महत्त्व यावर उपस्थितांनी सखोल चर्चा केली. सहभागी सदस्यांनी आपले अनुभव मांडत वाचनाची आवड जोपासण्याचा संदेश दिला. या संवादात्मक उपक्रमामुळे उपस्थितांना विविध पुस्तकांची ओळख होण्यासोबतच नव्या विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षिका कमल भावनानी व सना खान उपस्थित होत्या. त्यांनी वाचनाचे महत्त्व, पुस्तकांमधून घडणारे व्यक्तिमत्त्व विकासाचे पैलू आणि तरुणांनी नियमित वाचनाची सवय जोपासण्याची गरज याविषयी मार्गदर्शन केले.



उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये तन्मय सिंग व हर्षित साहू यांनी विशेष व महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कार्यक्रमाच्या संकल्पनेपासून ते नियोजन आणि अंमलबजावणीपर्यंत त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी तन्मय सिंग यांनी सांगितले की, बुक मेहफिलसारखे उपक्रम युवकांना एकत्र आणून त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण घडवून आणतात. पुस्तकांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. भविष्यात अधिकाधिक तरुणांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे अशी अपेक्षा आहे.

हर्षित साहू यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, आजच्या डिजिटल युगात वाचनाची सवय टिकवून ठेवणे काळाची गरज आहे. बुक मेहफिलमुळे पुस्तकांवरील चर्चा, अनुभवांची मांडणी आणि प्रेरणादायी विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एक सुंदर व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. प्रमुख पाहुण्या कमल भावनानी यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, पुस्तके ही आपल्या आयुष्याची खरी मित्र असतात. प्रत्येक पुस्तक आपल्याला नवीन विचार, नवीन दृष्टिकोन आणि जीवन जगण्याची नवी दिशा देते. अशा उपक्रमांमुळे वाचन संस्कृती अधिक बळकट होण्यास मदत होते.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सहभागी झालेल्या सर्व २० स्पर्धकांना त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल मेडल प्रदान करून सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा गौरव सोहळा पार पडला. सहभागींच्या चेहऱ्यावरील आनंद आणि समाधानाने कार्यक्रमाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली. कार्यक्रमास इन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, महासचिव यश दुबे, प्रनय उत्साटकर, महिला व बालकल्याण सचिव शीतल गाडगे, सहसचिव अरबाज खान तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यापुढेही समाजामध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी आणि पुस्तकप्रेमींना एकत्र आणण्यासाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# भाजप कामगार आघाडीच्या खारघर मंडळ संयोजकपदी मनेश पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष, खारघर शहर मंडळाच्या कामगार आघाडीच्या संयोजकपदी सामाजिक कार्यकर्ते मनेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, ॲड. नरेश ठाकूर, नगरसेवक मधू पाटील, नगरसेविका परेशा पटेल, अनिता पाटील तसेच शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मनेश पाटील गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष, साईमल्हार पदयात्रेचे उपाध्यक्ष, ग्रामस्थ मंडळ मुर्बीचे उपाध्यक्ष, केवायसी खारघर युथ कौन्सिलचे संस्थापक तसेच सेक्टर-१८ ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष म्हणून विविध सामाजिक, धार्मिक व संघटनात्मक क्षेत्रात कार्यरत आहेत. समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणारे, सामाजिक, धार्मिक, क्रीडा व जनहिताच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. नियुक्तीनंतर मनेश पाटील म्हणाले की, पनवेल महानगरपालिका निवडणुकीपूर्वी मी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यावेळी प्रभाग क्रमांक ४ आणि ६ मध्ये विशेष मेहनत घेऊन पक्षाच्या चारही उमेदवारांच्या विजयासाठी काम केले. माझ्या सामाजिक कार्याची आणि पक्षनिष्ठेची दखल घेत पक्षाने मला कामगार आघाडीच्या संयोजकपदाची जबाबदारी दिली याचा मला आनंद आणि अभिमान आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विकास, सुशासन आणि जनकल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात विकासाची नवी दिशा निर्माण होत आहे. राष्ट्रहित, विकास आणि जनसेवा या विचारांशी स्वतःला अधिक जवळचे वाटत असल्याने मी भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. राजकारण केवळ पदांसाठी नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. भाजपच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडविणे, युवकांना रोजगार व संधी उपलब्ध करून देणे आणि समाजहिताची विविध कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले. मनेश पाटील यांच्या नियुक्तीमुळे खारघर परिसरातील कामगार, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे न्याय मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# बोकडविरा-जेएनपीए वसाहत मार्गावरील वाहतूक कोंडी फुटणार

**उरण : वार्ताहर**

सिडकोच्या माध्यमातून उरण-पनवेल मार्गावरील बोकडविरा ते जेएनपीए कामगार वसाहतीदरम्यानच्या ४.५ किलोमीटर लांबीच्या मार्गाच्या रुंदीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या मार्गाचे रुंदीकरण करावे यासाठी आमदार महेश बालदी यांनी पाठपुरावा केला आहे. या मार्गाच्या रुंदीकरणामुळे जेएनपीए कामगार वसाहतीनजीक होणाऱ्या वाहतूक कोंडीचा त्रास कमी होण्यास मदत होणार आहे.



## ४.५ किमी रस्त्याचे रुंदीकरण सुरू

त्यामुळे उरणच्या नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. उरण-पनवेल मार्गावर सर्वांत जास्त रहदारी असलेल्या उरण ते जेएनपीए कामगार वसाहत या सहा किलोमीटर लांबीच्या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे या मार्गावरील अपघातांतही वाढ झाली आहे. यात उरण कोर्टनाका ते बोकडविरा पोलीस चौकी हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे, तर पोलीस चौकी ते जेएनपीए कामगार वसाहत हा मार्ग सिडकोकडे वर्ग करण्यात आला आहे. या मार्गाच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी या दोन्ही आस्थापनांची आहे. यातील बोकडविरा पोलीस चौकी ते कोर्टनाकादरम्यानच्या १,६०० मीटर लांबीच्या उरण-पनवेल मार्गाचे रुंदीकरणाचे काम करण्यात आले आहे. त्यामुळे सात मीटर रुंद असलेला हा मार्ग १४ मीटर रुंद होणार आहे. तसेच या मार्गाला दुभाजकही बसविण्यात येणार आहेत.

त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदाही काढली आहे, मात्र विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्याने या मार्गाच्या रुंदीकरणाचे काम रखडले आहे. हे काम लवकरच पूर्ण होणार असल्याचा दावा सार्वजनिक बांधकाम विभागाने केला आहे. उरण ते नेरूळ/बेलापूर लोकल आणि उरणच्या द्रोणागिरी परिसरात वाढणारी लोकवस्ती यामुळे उरण-पनवेल मार्ग हा प्रचंड रहदारीचा बनला आहे. या मार्गावरील वाढत्या वाहनांमुळे अपघातही वाढले आहेत. दुहेरी मार्ग असलेल्या या मार्गाचे रुंदीकरण करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. त्यात पावसाळ्यात येणाऱ्या मार्गाच्या बाजूच्या झाडाझुडपांमुळे मार्ग अधिकच अरुंद होतो.

त्यामुळे वाहन चालवणे जिकिरीचे होते. त्यात या झाडाझुडपांत काटेरी झाडे असल्याने वाहनचालक जखमी होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे मार्गाच्या रुंदीकरणाची मागणी जोर धरू लागली आहे. उरण-पनवेल राज्य महामार्ग दोन आस्थापनांमध्ये विभागला गेला आहे. यात नवघर ते बोकडविरा पोलीस चौकीपर्यंतचा मार्ग सिडकोकडे, तर कोर्टनाका ते बोकडविरा पोलीस चौकी हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे.

> **सिडकोकडे वर्ग करण्यात आलेल्या ४.५ किलोमीटर लांबीच्या जेएनपीए कामगार वसाहत ते बोकडविरा मार्गाच्या रुंदीकरणाचे काम मंजूर करण्यात आले आहे. या कामाची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे, मात्र या कामात खारफुटी असल्याने त्याची परवानगी आवश्यक आहे, परंतु याशिवायच्या मार्गाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.**
>
> **-आर. पी. रोडे, अधीक्षक अभियंता, सिडको द्रोणागिरी नोड**

# उलव्यात अल्पवयीन मुलींची वेश्याव्यवसायात ढकलून विक्री; महिला दलाल गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

उलवा परिसरात अल्पवयीन मुलींना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायात ढकलल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी उलवा पोलिसांनी कारवाई करत एका महिला दलालाला अटक केली असून तिच्याविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सेक्टर १९ येथील एका लॉजमध्ये अल्पवयीन मुलींना ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. छापेमारीदरम्यान दोन अल्पवयीन मुलींची सुटका करण्यात आली. प्राथमिक चौकशीत आरोपी महिला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मुलींना देहव्यापारासाठी प्रवृत्त करत असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता २०२३, अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा, बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा तसेच बालन्याय अधिनियमातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलींच्या शोषणाशी संबंधित गंभीर स्वरूपाच्या कलमांचा समावेश असल्याने प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांनी रोख रक्कम, मोबाइल फोन आणि इतर साहित्य असा सुमारे ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या रॅकेटमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का? तसेच मुलींना या व्यवसायात आणण्यासाठी कोणते जाळे कार्यरत होते याचा तपास पोलीस करीत आहेत. उलवा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# महेश साळुंखे यांच्याकडून मोफत वह्यावाटप

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी मातोश्री सुमन साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रायगड जि.प.च्या वडघर प्राथमिक शाळेत मोफत वह्यांचे वाटप केले.

कार्यक्रमाला अमित हिरवे, अरुण जाधव, प्रेम पाटील, सुजित गुळवे, राहुल पाटील, प्रशांत सोनवणे, निलेश कांबळे, मनोज कांबळे, अरुण कांबळे, अशोक कदम, किशोर कदम, मुमताज पठाण, अल्पसंख्याक अध्यक्ष आसिफ शेख, जावेद मास्टर, प्राथमिक शाळेचे शिक्षक जयदास घरत, शिक्षक जितेंद्र महाले व शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.



# उरणच्या विमला तलावावर रंगला 'कविकट्टा'

**उरण : बातमीदार**

उरणमधील विमला तलावावरील 'कविकट्टा' प्रत्यक्ष अनुभवण्याचा आनंद कोमसाप उरणने दिलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदामुळे मिळाला. कट्ट्यावरची सहजता आनंददायी वाटली, असे विचार अध्यक्ष डॉ. जयपाल पाटील यांनी मांडले. यावेळी साहित्यरत्न प्रा. एल. बी. पाटील, कोकण रस्त्याचे अभ्यासक चैतन्य उषा लक्ष्मण, प्राचार्य साहेबराव ओहोळ, भुवनेश्वर पाटील, राम म्हात्रे, देवदत्त सूर्यवंशी, मारोती तांबे, मीना ब्रीद, प्रवीण पुरो, विवेक भांडारकर, ज्येष्ठ पत्रकार घनशाम कडू, तृप्ती भोईर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मच्छिंद्र म्हात्रे यांनी, तर सूत्रसंचालन संजय होळकर यांनी केले. यावेळी आगरी ज्येष्ठ कवी पुंडलिक म्हात्रे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. 'एल्गार टोलविरुद्ध कविता' विषयासाठी सुनील पाटील, मनोहर म्हात्रे, न. ग. पाटील, अवंतिका महाडिक, वैभव धनावडे, कल्पना म्हापुसकर यांना बक्षीसपात्र म्हणून सन्मानित करण्यात आले.

## संपादकीय

# सुधारणांचे स्वागत

यंदाची नीट परीक्षा पारदर्शकता, शिस्त आणि गुणवत्तेच्या निकषांवर यशस्वी ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करताना सरकारच्या सुधारणा प्रयत्नांचे स्वागत करणे आवश्यक आहे. काही वादग्रस्त घटनांनंतर केंद्र सरकारने नीट परीक्षा सुरक्षेबाबत कठोर भूमिका घेतली आहे.

**प्रश्नपत्रिका गळती, गैरव्यवहार आणि परीक्षा व्यवस्थापनाविषयी निर्माण झालेल्या शंकांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरण यांच्यासमोर यंदाची नीट परीक्षा अधिक विश्वासार्ह आणि पारदर्शकपणे पार पाडण्याचे मोठे आव्हान आहे. परीक्षा केंद्रांची तपासणी, डिजिटल देखरेख, उमेदवारांची बहुपदरी ओळख पडताळणी, प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था आणि गैरप्रकारांवर कठोर कारवाई यांसारख्या उपाययोजनांमुळे परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे. शिक्षण मंत्रालयाने राज्य सरकारे, पोलीस यंत्रणा आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय वाढवून परीक्षा व्यवस्थापन अधिक सक्षम केले आहे. मे महिन्यातील नीट परीक्षेचा पेपर लीक झाल्याप्रकरणी काही संघटित टोळ्यांनी टेलिग्राम या ॲपचा वापर केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यामुळे ती परीक्षा रद्द करावी लागली होती. नीट-युजी पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने २२ जूनपर्यंत टेलिग्रामच्या सेवांवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णयही घेतला. या निर्णयाला टेलिग्रामने न्यायालयात आव्हान दिले. मात्र हे ॲप गुन्हेगार आणि दहशतवाद्यांचा अड्डा बनले आहे अशी माहिती केंद्र सरकारने टेलिग्रामच्या याचिकेला विरोध करणाऱ्या प्रतिज्ञापत्रात दिली आहे. टेलिग्राम हे समाजकंटकांना जोडणारे नवीन डार्क वेब बनले आहे. डिजिटल युगात संवादाची साधने जितकी उपयुक्त आहेत, तितकीच त्यांचा गैरवापर होण्याची शक्यताही वाढली आहे. टेलिग्रामसारख्या मंचाचा वापर अनेकदा आर्थिक फसवणूक व सायबर गुन्ह्यांसाठी होत असल्याच्या तक्रारी आहेत. अशा पार्श्वभूमीवर सरकारने अशा एखाद्या ॲपवर बंदी घालण्याचा निर्णय घेतल्यास तो राष्ट्रीय सुरक्षा आणि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने योग्यच म्हणावा लागेल. नीट वा इतक्या व्यापक स्तरावर होणारी कोणतीही परीक्षा पूर्णपणे त्रुटीमुक्त असू शकत नाही. मात्र व्यवस्थेतील त्रुटी ओळखून त्यात सुधारणा करणे हे सक्षम प्रशासनाचे काम असते. याच दृष्टिकोनातून केंद्र सरकारने परीक्षा व्यवस्थेत आवश्यक बदल केले असून विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा संपादन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सरकारकडून सुरू आहे. सतत सुधारणा आणि तंत्रज्ञानाचा वापर यामुळे परीक्षा प्रणाली अधिक मजबूत होत असल्याचे दिसून येते आहे. केंद्र सरकारच्या नव्या शिक्षण धोरणात गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षणाला विशेष महत्त्व आहे. देशभरात नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना, एमबीबीएसच्या जागांमध्ये वाढ आणि आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळ मजबूत करण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न यामुळे वैद्यकीय शिक्षणाची व्याप्ती वाढत आहे. नीट परीक्षा हा त्या व्यापक परिवर्तनाचा एक मोठा भाग आहे. विद्यार्थ्यांनीही आता अफवा किंवा अनावश्यक चर्चांमध्ये न अडकता आपल्या तयारीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पालक आणि समाजानेही विद्यार्थ्यांना सकारात्मक वातावरण देण्याची गरज आहे. देशाला सक्षम डॉक्टरांची आवश्यकता आहे आणि नीट ही केवळ परीक्षा नसून गुणवत्तेच्या आधारे संधी उपलब्ध करून देणारी राष्ट्रीय व्यवस्था आहे. वैद्यकीय शिक्षण अधिक सुलभ, न्याय्य आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याच्या दिशेने ही एक महत्त्वपूर्ण पायरी आहे. सरकारने केलेल्या उपाययोजना पाहता यंदाची नीट परीक्षा अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करणे वावगे ठरणार नाही.**

# प्लास्टिक टाळा आणि पर्यावरण वाचवा!



प्लास्टिकने गेल्या शतकात मानवी जीवनात मोठी सोय आणली. हलके, पाणी न झिरपणारे, टिकाऊ आणि कमी खर्चात बनणारे म्हणून प्लास्टिक प्रत्येक घरात पोहोचले. ब्रश, बादली, डबा, पिशवी, मोबाईल कव्हर, गाडीचे भाग ते औषधांचे पॅकिंग, सर्वत्र प्लास्टिक आहे. मात्र हेच प्लास्टिक आज पृथ्वीसमोरचे सर्वात मोठे पर्यावरणीय संकट बनले आहे. प्लास्टिक टाळणे ही आता पर्याय राहिलेला नाही, ती आपल्या आणि पुढच्या पिढ्यांच्या भविष्यासाठीची गरज आहे.जगात दरवर्षी ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक तयार होते. यातील ५०% प्लास्टिक 'सिंगल यूज' प्रकारचे असते. म्हणजे पाण्याची बाटली, स्ट्रॉ, चिप्सचे पाकीट, कॅरीबॅग यांसारख्या वस्तू काही मिनिटांच्या वापरानंतर फेकल्या जातात. प्लास्टिक नैसर्गिकरित्या कुजत नाही. एक प्लास्टिक पिशवी नष्ट व्हायला ५०० ते १००० वर्षे लागतात, तर पाण्याच्या बाटलीला त्याहून अधिक काळ लागतो. त्यामुळे १९५० पासून तयार झालेले जवळपास ८०% प्लास्टिक आजही जमिनीत, नद्यांमध्ये किंवा समुद्रात तसेच आहे.भारताचा विचार केला तर देशात दररोज २६,००० टनांहून अधिक प्लास्टिक कचरा निर्माण होतो. मोठ्या शहरांमध्ये हा आकडा अधिक आहे. हा कचरा योग्य पद्धतीने गोळा झाला नाही तर नाले तुंबतात, पूर येतो. समुद्रात जाणारा प्लास्टिक कचरा लाटांबरोबर आणि सूर्यप्रकाशामुळे तुटून त्याचे 'मायक्रोप्लास्टिक' तयार होते. हे ५ मिमीपेक्षा लहान तुकडे आता पिण्याच्या पाण्यात, समुद्री मिठात, मधात आणि माशांमध्येही सापडले आहेत. २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका जागतिक अहवालानुसार, सरासरी व्यक्ती दर आठवड्याला एका क्रेडिट कार्डाएवढे मायक्रोप्लास्टिक नकळत खातो.प्लास्टिकचा फटका फक्त निसर्गालाच नाही तर थेट आपल्या आरोग्यालाही बसतो. अनेक प्लास्टिक वस्तूंमध्ये BPA, थॅलेट्स, स्टायरीन यांसारखी रसायने वापरली जातात. गरम चहा प्लास्टिक कपात घेतल्यास, किंवा प्लास्टिक डब्यात अन्न मायक्रोवेव्हमध्ये गरम केल्यास, ही रसायने अन्नात उतरतात. ही रसायने शरीरातील हार्मोन्सच्या कार्यात अडथळा आणतात. लहान मुलांमध्ये विकासासंबंधी समस्या, महिलांमध्ये प्रजननासंबंधी अडचणी आणि सर्व वयोगटात रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे यांसारखे परिणाम दिसून येतात. प्लास्टिक कचरा उघड्यावर जाळल्याने डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे अतिशय विषारी वायू हवेत मिसळतात. त्यामुळे दमा, त्वचारोग आणि दीर्घकालीन आजारांचा धोका वाढतो.समुद्री जीवनावर तर प्लास्टिकने घाला घातलाच आहे. कासवांना प्लास्टिक पिशव्या जेलीफिश वाटतात आणि ती खाल्ल्याने त्यांचा मृत्यू होतो. पक्षी बाटल्यांची झाकणे अन्न समजून पिल्लांना भरवतात. मासेमारीच्या टाकून दिलेल्या जाळ्यांना 'घोस्ट नेट' म्हणतात. ही जाळी शेकडो वर्षे समुद्रात तरंगत राहतात आणि त्यात मासे, डॉल्फिन अडकून मरतात. २०२६ च्या सुरुवातीला झालेल्या एका मोहिमेत अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरून केवळ एका आठवड्यात १८ टन प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. यावरून समस्येची व्याप्ती लक्षात येते.मग यावर उपाय काय? उपायाची सुरुवात आपल्या घरापासून आणि आपल्या सवयींपासून होते. प्रत्येकाने छोटे बदल केले तरी एकत्रित परिणाम खूप मोठा होतो.पहिला आणि सर्वात सोपा उपाय म्हणजे 'नकार द्यायला शिका'. दुकानदाराने प्लास्टिक पिशवी दिली तर 'नको, माझ्याकडे कापडी पिशवी आहे' असे सांगण्याची सवय लावा. भाजी, फळे, धान्य खरेदीसाठी कायम कापडी, तागाची किंवा ज्यूटची पिशवी जवळ बाळगा. एक चांगली कापडी पिशवी ५०० पेक्षा जास्त प्लास्टिक पिशव्यांची गरज संपवते. पाण्यासाठी स्टील किंवा तांब्याची बाटली वापरा. बाहेर जाताना घरून पाणी नेल्याने प्रवासात प्लास्टिक बाटली विकत घ्यावी लागत नाही. ऑफिस, कॉलेजमध्ये स्वतःचा कप आणि चमचा ठेवा. ऑनलाइन जेवण मागवताना 'कटलरी नको' हा पर्याय निवडा.दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'पुन्हा वापरा आणि योग्य विल्हेवाट लावा'. ज्या प्लास्टिक वस्तू आधीच घरात आल्या आहेत, त्या लगेच फेकू नका. जाड प्लास्टिकचे डबे साठवणीसाठी, बाटल्यांपासून झाडांसाठी कुंड्या बनवता येतात. याला 'अपसायकलिंग' म्हणतात. जे प्लास्टिक खरोखरच टाकायचे आहे, ते स्वच्छ करून, सुके करून वेगळे ठेवा. ओला कचरा आणि सुका कचरा एकत्र केल्याने प्लास्टिक रिसायकल होऊ शकत नाही. अनेक शहरांमध्ये आता 'प्लास्टिक बँक' आणि 'कचरा वेचक' केंद्रे आहेत जिथे स्वच्छ प्लास्टिक दिल्यास त्याचा पुनर्वापर होतो. २०२६ मध्ये अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी स्वतःचे 'झीरो वेस्ट' उपक्रम सुरू केले आहेत, जिथे रहिवासी एकत्र येऊन प्लास्टिकचे व्यवस्थापन करतात.तिसरा मार्ग म्हणजे 'प्लास्टिकला पर्याय निवडणे'. बाजारात आता अनेक चांगले पर्याय उपलब्ध आहेत. बांबूपासून बनवलेले ब्रश, स्टीलच्या स्ट्रॉ, काचेच्या किंवा स्टीलच्या डबे, मातीची भांडी, केळीच्या पानांच्या पत्रावळी, उसाच्या चिपाडापासून बनवलेले डिश हे सर्व पर्याय सहज मिळतात. २०२५ नंतर 'कंपोस्टेबल प्लास्टिक'चा वापर वाढला आहे. हे मक्याच्या स्टार्चपासून किंवा बांबूच्या फायबरपासून बनते आणि ९० दिवसांत मातीत पूर्णपणे विरघळते. लग्नसमारंभ, वाढदिवस यांसारख्या कार्यक्रमांसाठी आता भाड्याने स्टीलची भांडी देणाऱ्या सेवा सुरू झाल्या आहेत, ज्यामुळे थर्माकोल आणि प्लास्टिक डिशचा वापर टाळता येतो.चौथी गोष्ट म्हणजे 'जागरूकता पसरवणे'. लहान मुलांना शाळेतूनच प्लास्टिकचे तोटे समजावून सांगितले पाहिजेत. 'बेस्ट आऊट ऑफ वेस्ट' सारख्या स्पर्धांमधून मुलांना प्लास्टिकच्या पुनर्वापराचे महत्त्व कळते. समुद्रकिनारे, बगिचे, गड-किल्ले येथे स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी व्हावे. सोशल मीडियाचा वापर करून चांगल्या सवयी लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. जेव्हा एक व्यक्ती बदलते, तेव्हा ती दहा जणांना प्रेरणा देते.भविष्यासाठी आशादायक गोष्टीही घडत आहेत. संशोधक प्लास्टिक खाणाऱ्या बॅक्टेरिया आणि बुरशीवर काम करत आहेत. २०२६ मध्ये 'प्लास्टिक ते इंधन' बनवणारे छोटे प्रकल्प अनेक ठिकाणी यशस्वी झाले आहेत. रस्ते बनवण्यासाठी प्लास्टिक कचरा वापरण्याचे तंत्रज्ञान आता अधिक विकसित झाले आहे. असे रस्ते जास्त टिकाऊ आणि पाण्याला प्रतिरोध करणारे असतात. अनेक मोठ्या कंपन्या 'प्लास्टिक न्यूट्रल' होण्याच्या दिशेने काम करत आहेत. म्हणजे त्या जितके प्लास्टिक बाजारात आणतात, तितके प्लास्टिक त्या पर्यावरणातून गोळा करून रिसायकल करतात.शेवटी, निसर्ग आपल्याला सर्व काही विनामूल्य देतो. शुद्ध हवा, पाणी, अन्न, सावली. त्याची परतफेड करणे हे आपले कर्तव्य आहे. प्लास्टिक टाळणे ही शिक्षा नाही, तर निसर्गाशी नव्याने नाते जोडण्याची संधी आहे. आज एक पिशवी नाकारली, एक बाटली पुन्हा वापरली, तर उद्याचा समुद्र अधिक स्वच्छ असेल, उद्याची नदी अधिक निर्मळ असेल व उद्याची पिढी अधिक निरोगी असेल. पर्यावरण वाचवणे म्हणजेच स्वतःला वाचवणे. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

## मायक्रोवेव्हमधील अन्न कॅन्सरला कारणीभूत?

मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये अन्न गरम केल्याने कॅन्सर होतो, हा गैरसमज सध्याच्या काळात खूप दूरवर पसरला आहे.



अन्न तंत्रज्ञान तज्ज्ञ डॉ. संदीप जोशी स्पष्ट करतात की, मायक्रोवेव्ह नॉन-आयोनायझिंग रेडिएशन वापरतो. हे रेडिएशन एक्स-रे किंवा गॅमा किरणांसारखे नसते. ते फक्त अन्नातील पाण्याच्या रेणूंना वेगाने कंपन देऊन एक प्रकारची नवीन उष्णता निर्माण करते. यामुळे अन्नाचे रासायनिक बंध तुटत नाहीत किंवा अन्न किरणोत्सर्गीदेखील होत नाही. ओव्हन बंद केल्यावर रेडिएशनही थांबते. अर्थातच त्यामुळे अन्नातदेखील ते साठत नाही. दरम्यान, आता जागतिक आरोग्य संघटना आणि अमेरिकेच्या FDA ने मायक्रोवेव्ह ओव्हन अन्नासाठी सुरक्षित असल्याचे जाहीर केले आहे. मायक्रोवेव्हमुळे अन्नातील पोषक घटक इतर पद्धतींनी शिजवण्यापेक्षा जास्त नष्ट होत नाहीत. तर उलट कमी पाण्यात आणि कमी वेळात शिजवल्याने व्हिटॅमिन सी आणि बीसारखी पोषकद्रव्ये जास्त प्रमाणात टिकून राहतात, मात्र धोका ओव्हनमुळे नाही, तर चुकीच्या भांड्यांमुळे निर्माण होत असतो. प्लास्टिकच्या डब्यात किंवा फॉइलमध्ये अन्न गरम केल्यास BPA आणि थॅलेट्ससारखी रसायने अन्नात उतरू शकतात हे आता सिद्ध झाले आहे. स्टायरोफोम वितळून विषारी घटक बाहेर टाकतो. मेटलची भांडी वापरल्यास स्पार्क होऊन त्यामुळे आगदेखील लागू शकते. क्रॅक असलेल्या जुन्या ओव्हनमधून लीकेज होऊ शकते, म्हणून डोअरची रबर सील आपण नियमित तपासावी. त्यामुळे नेहमी 'मायक्रोवेव्ह सेफ' असा शिक्का असलेली काच किंवा सिरॅमिक भांडीच वापरावीत. अन्न झाकून गरम करावे, म्हणजे वाफेमुळे समान उष्णता मिळेल आणि साल्मोनेला, ई-कोलायसारखे बॅक्टेरिया मरतील. अर्धवट गरम झालेले अन्न जिवाणू वाढवू शकते, म्हणून मधूनमधून ढवळावे आणि पूर्ण गरम झाल्याची खात्री करावी. मुलांचे दूध मायक्रोवेव्हमध्ये गरम करू नये कारण ते असमान तापते आणि बाळाचे तोंड भाजू शकते. जुना, खराब झालेला ओव्हन वापरू नये. अशा प्रकारे योग्य ती काळजी आणि खबरदारी घेतल्यास मायक्रोवेव्ह पूर्णपणे सुरक्षित आहे आणि वेळ व इंधनाची बचत करणारे उपयुक्त साधन आहे.

# विनोदी लेखक, प्रवासवर्णनकार, कथाकार रमेश मंत्री



### निमित्त

विनोदी लेखक, प्रवासवर्णनकार, कथाकार म्हणून मराठी साहित्यात स्वतःचे स्थान निर्माण करणारे रमेश मंत्री यांचा आज स्मृतिदिन. मूळचे नाव रमेश शंकर कुळकर. त्यांचा जन्म ६ जानेवारी १९२५ रोजी कोकणात कुडाळजवळच्या झाराप या गावी झाला. राजाराम मंत्री यांना दत्तक गेल्यानंतर त्यांचे नाव रमेश राजाराम मंत्री झाले. त्यांचे शिक्षण कोल्हापूरला झाले. एमए करीत असतानाच त्यांनी पत्रकारितेत प्रवेश केला. नंतर वृत्तपत्र व्यवसायाचे प्रगत शिक्षण घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले.

१९५८ साली अमेरिकन सरकारच्या माहिती खात्यात अधिकारी या नात्याने रमेश मंत्री वास्तव्यासाठी अमेरिकेत गेले. १९७८ सालापर्यंत ते तिथे होते. त्या काळात देश-विदेशांत त्यांचा भरपूर प्रवास झाला. त्या प्रवासातील अनुभवांवर त्यांनी प्रवासवर्णने लिहिली. त्यांच्या लेखनाचा झपाटा वाखाणण्याजोगा होता. १९७९ साली एकाच वर्षात ३४ पुस्तके लिहिण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या नावावर १३०हून अधिक पुस्तके आहेत. त्यातली बरीचशी प्रवासवर्णने व विनोदी पुस्तके आहेत. 'थंडीचे दिवस', 'सुखाचे दिवस', 'नवरंग' ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णने आहेत. प्रांजळ, प्रसन्न, दिलखुलास लेखणीतून उतरलेली त्यांची प्रवासवर्णने वाचकांना त्या स्थळांच्या प्रत्यक्ष भेटीचा आनंद देतात. 'आंध्र', 'ओरिसा', 'एलिझाबेथ टेलर आणि मी', 'ओ कलकत्ता', 'करीन ती पश्चिम', 'दिशांतर', 'गांधीजींचा गुजरात', 'चार मीनार', 'जपानी आटापिटा', 'सूर्यपुत्रांचा देश', 'बारा लाखांत जगाची सफर', 'बंगलोर ते बदामी', 'संगमरवरी प्रदेश', 'सोमनाथ ते साबरमती' यासारखी अनेक प्रवासवर्णने त्यांनी लिहिली.

विनोदी फॅण्टसी हा सर्वस्वी नवा साहित्यप्रकार त्यांनी मराठी वाङ्मयात रूढ केला. त्यातूनच जेम्स बॉण्डच्या धर्तीवर जनू बांडे ही विडंबनात्मक व्यक्तिरेखा त्यांनी निर्माण केली. 'सह्याद्रीची चोरी', 'सचिवालयात हत्ती', 'अति झालं नि हसू आलं', 'ओठ सलामत तो', 'एका हाती टाळी', 'झाली काय गंमत', 'हसण्याचा तास तिसरा', 'थट्टा मस्करी', 'चोरांचा सौजन्य सप्ताह' यांसारखी आणखीही 'विनोद' याप्रकारात मोडणारी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. 'मुलखावेगळी माणसं', 'अशी असतात एकेक माणसं', 'तुमच्या पायी ठेविले मन' ही व्यक्तिचित्रणात्मक पुस्तके आणि 'साप्ताहिकी', 'चटक चांदणी', 'कुंकू', 'उत्तरकाल', 'उत्तरकांड', 'गुजगोष्टी', 'चंदेरी', 'आटापिटा' यांसारखी नाट्य, कथा, कादंबरी प्रकारांतील साहित्यनिर्मितीही त्यांनी केली.

१९९२सालच्या कोल्हापूरच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अध्यक्षपदावरून सोडलेल्या संकल्पाच्या पूर्तीसाठी त्यांनी गावोगावी पुस्तकांची प्रदर्शने भरवली. त्यांनी लेखकांच्या भाषणांचे ९५ कार्यक्रम वर्षभरात घडवून आणले. इंग्लंडमध्ये असताना अवकाशवीर नील आर्मस्ट्रॉंग व अभिनेत्री एलिझाबेथ टेलर यांना प्रत्यक्ष भेटण्याची मिळालेली संधी ही त्यांच्यासाठी अतीव समाधानाची बाब होती. आपले एक तरी पुस्तक रशियाचे अध्यक्ष गोर्बाचेव्हला अर्पण करण्याची आणि कर्मयोगी बाबा आमटे यांचे चरित्र लिहिण्याची अशी त्यांची दोन स्वप्ने जागीच विरली. अर्धांगवायूमुळे त्यांच्या भ्रमंतीला आणि गप्पाटप्पांना १९ जून १९९८ रोजी खीळ बसली हा दैवदुर्विलास होय.

**-सविता टांकसाळ**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

## ऑफिसमध्येही फिटनेस अशा प्रकारे राखा...

प्रदीर्घ काळ एकाच जागी बसून काम केल्याने स्नायू आखडतात. ऑफिसमध्ये आठ-आठ तास लॅपटॉपसमोर बसणं, कामात सतत लक्ष देणं, कामाच्या मधे ब्रेक न घेता येणं या सवयी शरीरावर नकळत परिणाम करतात.



सीटिंग इज द न्यू स्मोकिंग म्हणजेच सतत बसून राहणं हे आपल्या आरोग्यासाठी तितकंच घातक आहे, जितकं सिगारेटचं व्यसन! त्यामुळे या लेखात आपण पाहूया, की ऑफिसमध्ये किंवा घरच्या वर्क फ्रॉम होम सेटअपमध्ये कोणते बदल केले तर आपण जास्तीत जास्त ॲक्टिव राहू शकू.

बैठ्या कामाचे परिणाम हे शरीरातील बहुतेक सगळ्या अवयवांवर होतात. मानेचे आणि वरच्या पाठीचे स्नायू आखडतात. कंबरेचे स्नायू दीर्घकाळ ताणलेल्या अवस्थेत राहतात. काही स्नायू अति प्रमाणात ताणले जातात आणि काही अति प्रमाणात आखडून जातात. यामुळे स्नायूंना पुरेसा रक्तपुरवठा होत नाही. सतत बसून काम केल्याने चयापचय क्रिया मंदावते. परिणामी पोटावरील चरबीचं प्रमाण वाढतं, परिणामी स्थूलता वाढते, डायबेटिस, ब्लड प्रेशर, सांध्यांचे त्रास यांची शक्यता वाढते. पायाचे सांधेदेखील आखडून जातात. फुप्पुसांची कार्यक्षमता कमी होते. एका जागी बसून स्क्रीन वर काम करणाऱ्या व्यक्तींच्या डोळ्यावर ताण येतो.

**डेस्क एक्झरसाइजेस म्हणजे काय?**

डेस्क एक्झरसाइजेस म्हणजे काही सोप्या, सौम्य आणि पटकन होणाऱ्या हालचाली ज्या आपल्याला अगदी ऑफिसच्या खुर्चीवर बसल्या बसल्या ही करता येतात. या हालचालींमुळे बसून काम करण्याचे दुष्परिणाम बऱ्याच अंशी कमी होतात.

**हे डेस्क एक्झरसाइजेस कसे करावे?**

आपल्या कामाच्या पद्धतीनुसार आणि वेळेनुसार तसाच आपल्या वयाला अनुसरून हे व्यायाम ठरवले जातात. साधारणपणे मानेच्या आणि कंबरेच्या स्नायूंना योग्य प्रमाणात ताण देऊन ते पुन्हा सैल सोडले जातात, यामुळे स्नायूंवर आणि सांध्यांवर आलेला ताण कमी होतो, वेदना कमी होतात.

फिजियोथेरेपिस्ट तुम्हाला हे व्यायाम योग्य पद्धतीने शिकवू शकतात, त्यानंतर आपल्या स्मार्ट वॉचेसमध्ये किंवा मोबाईल फोनमध्ये या व्यायामांसाठी रिमाइंडर लावून ते अगदी सहजरीत्या कामाच्या ठिकाणी केले जाऊ शकतात.

# पेण-खोपोली रस्ता रुंदीकरणासाठी अतिक्रमण हटवणार

## आमदार रविशेठ पाटील यांच्याकडून पाहणी

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहराची वाढती लोकसंख्या पाहता येथील रस्ते रुंदीकरणाच्या कामाला वेग येत असताना पेण-खोपोली रस्ता रुंदणीकरणात येणाऱ्या अतिक्रमणांना हटविण्याचे काम नगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असल्याने यावेळी शहराच्या अतिक्रमणांची आमदार रवीशेठ पाटील यांनी दि. १८ रोजी पाहणी केली.

पेण नगरपालिका कार्यालयासमोरील बाजारपेठच्या सुरुवातीपासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यात येत असल्याने या दरम्यान असलेल्या अतिक्रमण धारकांना पेण नगरपालिका प्रशासनाच्या वतीने बांधकामासह गाळे खाली करावे अशा नोटीसा देत आदेश देण्यात आले आहे.




परंतु काही गाळा धारकांनी तात्काळ खाली न करता थोडा आणखी वेळ मिळावा अशी मागणी केली परंतु येणारा पाऊस पाहता रस्त्याचे काम लवकरात लवकर व्हावे याकरिता नगरपालिका प्रशासन पुढे आले असून आज आमदार रवीशेठ पाटील यांनीही सदर अतिक्रमणाची पाहणी करत अतीजीर्ण झालेली इमारती गाळे धारक यांच्या जीवाला अधिकच धोका पाहता आणि शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी शहरातील रस्ते रुंदणीकरण होणे काळाची गरज असल्याचे ओळखून अतिक्रमण हटले पाहिजे त्यामुळे गाळेधारकांना स्वतःहून पुढाकार घेत अतिक्रमण हटवून घ्यावे अशी चर्चा अतिक्रमणधारकांबरोबर त्यांनी केली.

गाळेधारक स्वतःहून खाली करत आहेत. त्यामुळे त्यांना दोन दिवस वाढवून देण्यात यावे, असे नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी संबंधित नगरपालिका अधिकारी यांना सांगितले.

यावेळी नगराध्यक्ष प्रितम पाटील, सभापती आनंद जाधव, कलावती पाटील, आफ्रिन अखवारे, नगरसेवक अजय क्षीरसागर, मितेश शहा, साकिब मुजावर, नपा.बांधकाम विभाग अधिकारी सुहास कांबळे, प्रशासनाधिकारी गणेश सिंग ठाकूर, अतिक्रमण विभाग अधिकारी महेश वडके, आरोग्य अधिकारी दयानंद गावंड, विश्वनाथ गायकवाड, प्रशांत ढवळे आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

# बेकायदेशीर पिस्तूल, काडतुसे बाळगणाऱ्या तरुणाला अटक

**खालापूर : प्रतिनिधी**

बेकायदेशीर रित्या काडतुस आणि पिस्तूल जवळ बाळगणाऱ्या समीर सुधीर पवार वय ३२ रा. आळी आंबिवली याला रसायनी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

समीर याचयाकडे बेकायदेशीरपणे पिस्तूल असल्याची माहिती खबर्यामार्फत रसायनी पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांना मिळाली होती. रसायनी पोलिसांना माहितीचा आधारे महिला पोलीस निरीक्षक अनुसया ढोणे, पोलीस नाईक नितीन शेडगे, हेमंत कोकाटे ,पोलीस हवालदार सुरेश पवार यांच्या पथकाने सुरेशाच्या घरी छापा टाकला .त्यावेळी एका पिशवीमध्ये बेकायदेशीररित्या लपवलेले पिस्तूल आढळून आले.

आरोपी समीर पवार याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याने पिस्तूल कशासाठी बाळगले होते याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.



## करंजखोल प्राथमिक शाळेत मगरींविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती

**महाड : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय मगर दिन १७ जून रोजी सर्वत्र साजरा केला जातो. या निमित्ताने आज करंजखोल येथील प्राथमिक शाळेमध्ये स्लाईड शो करून मगरींविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.महाड शहरालगत सावित्री नदीमध्ये सापडणाऱ्या मगरी नैसर्गिक आणि अनैसर्गिक कारणामुळे मानवी वस्तीत आढळून येतात, त्यांच्या अशा पद्धतीच्या वस्तीमध्ये येण्याने एक प्रकारची भीती निर्माण होते. या मगरी इंडियन मार्श क्रोकोडाइल या जातीचे आहेत. त्या मानवावर हल्ला करत नाहीत. शालेय विद्यार्थी जीवनापासून अशा प्राण्यांबद्दल जनजागृती करून त्यांना ती व्यवस्थित समजून सांगितली.

# शेतकरी जगला तरच देश टिकेल -कृषी सभापती वैकुंठ पाटील

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व कृषी विभाग यांच्या वतीने महाड येथे कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना पशुसंवर्धन व दुग्ध विकास सभापती वैकुंठ पाटील यांनी शेतकरी टिकला तरच देश टिकेल, शेतकरी हा देशाचा कणा आहे, तो जगाचा पोशिंदा आहे, आणि हे आपले भाजप सरकार या शेतकऱ्याच्या मागे खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शासकीय योजनांचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी कटीबद्ध आहे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.



केंद्र सरकारच्या वतीने राज्याच्या दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी व कृषी उत्पादन वाढविण्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली आहे. कृषी उत्पादन वाढण्याच्या प्रयत्नासाठी रायगड जिल्हा परिषदेचा कारभार लोकाभिमुख आणण्यासाठी रायगड जिल्हा परिषद व कृषी विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणात तालुक्यात कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. बुधवार दिनांक १७ जून रोजी महाड तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन व दुग्धविकास कृषी सभापती वैकुंठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कृषी मेळावा संपन्न झाला

या प्रसंगी अर्थ, शिक्षण व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, महाड पं.स. सभापती प्रेरणा सावंत, उपसभापती सुरेश महाडिक, भाजपच्या उपाध्यक्षा मंजुषा कुद्रीमोती, जि.प. सदस्य मंसुर ताज, मनाली काळीजकर, निलेश ताठरे, जिप कृषी अधिकारी पवन कुमार, गटविकास अधिकारी उदयसिंह साळूंके, कृषी अधिकारी धिरज तोरणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करून पुरस्कार देण्यात आले. तसेच सभापती वैकुंठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली छापण्यात आलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या शेतकरी मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. महाड येथील चवदार तळे प्रांगणामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कृषी मेळाव्याला महाड तालुक्यातील विविध बचत गट व कृषी महाविद्यालयाकडून शेतीत उपयोगात येणाऱ्या वस्तू औषधे व खतांचे स्टॉल उभारण्यात आले होते. विविध यांत्रिकी उपकरणांची या ठिकाणी प्रदर्शन देखील भरविण्यात आले होते.

या कृषी मेळाव्याला मार्गदर्शन करताना वैकुंठ पाटील यांनी शेतकरी मोठ्या कष्टाने आपले जमीन पिकवून जगाला अन्नपूर्वीत असतो. पूर्वी व आजही शेती पूर्णपणे हवामानावर अवलंबून आहे.


### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the Share Certificate No. 55 of Ten shares bearing distinctive Nos. 541 to 550 of **BALAJI RESIDENCY ADAI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, ADAI VILLAGE, PANVEL, DIST RAIGAD,** standing in the name of **MR. SUBODH RAJARAM PAWAR & MRS. PRIYA SUBODH PAWAR, Flat No. E-201** has been reported lost and that an application to issue for a Duplicate Certificate in respect thereof has been made to the society at **BALAJI RESIDENCY ADAI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, SURVEY NO 100/2 ADAI VILLAGE, PANVEL, DIST RAIGAD,** to whom objection, if any, against issuance of such duplicate Share Certificates should be made within 15 days from the date of publication of this notice.

14/06/2026
Ref. No.: BALAJI/MISC/2026-2027

Sd/- CHAIRMAN | Sd/- SECRETARY | Sd/- TREASURER

FOR BALAJI RESIDENCY ADAI CO-OP HSG. SOC. LTD., ADAI, PANVEL
Survey No. 100/2, Adai Village, Tal. Panvel, Dist. Raigad-410 206.
Email: balaji.residency.adai@gmail.com



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मालक व कबजेदार १. श्रीमती वंदना दाजीराव देशमुख, २. श्री. उमेश दाजीराव देशमुख, ३. श्री. उदय दाजीराव देशमुख, अ. क्र. १ ते ३ सर्व राहणार मु. कोंदिवडे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड आणि ४. सौ. वृंदा वैभव धनवी उर्फ देशमुख, राहणार भिसेगाव, कर्जत–गुंडगे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड यांचे नावे महसुल दप्तरी सातबाराच्या उताऱ्यावर दाखल आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेंप्रमाणेः

**मौजे कोंदिवडे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे–आर–पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | ३९/२/ब | ०–७३–५० पो.ख. ०–०१–८० **एकूण ०–७५–३०** | ०४.३१ |

आमचे अशिलाने 'सदर जमीन मिळकती' खरेदिखताच्या व्यवहाराने विकत घेण्याबाबत जमीन मालक श्रीमती वंदना दाजीराव देशमुख वगैरे ४ यांचेबरोबर समजुतीचा करार केलेला आहे. आणि जमीन मालक श्रीमती वंदना दाजीराव देशमुख वगैरे ४ यांनी सदर जमीन मिळकतीबाबत हरकती मागविणेकरीता वर्तमानपत्रात जाहीर नोटिस प्रसिध्द करण्याचे अधिकार आमचे अशिलास दिलेले आहेत.

तरी सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने सुचित करण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या सदर जमीन मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क – हितसंबंध व अधिकार असल्यास आणि अगर कोणाही व्यक्ती, इसम वा संस्थेने सदर जमीन मिळकतीच्या भोगवटादार सदरी नावे असलेल्या व्यक्तींशी खरेदीखत, साटेकरार, विकसन करार, अखत्यारपत्र, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, एम.ओ.यू, भाडेपट्टा, गहाण, दान, बक्षीसपत्र, इच्छापत्र वगैरे अगर अन्य प्रकारे कोणताही कायदेशीर मालकी हक्क–हितसंबंध, ताबेकबजा, वहीवाट वापर वगैरे अधिकार व हक्क निर्माण केला असल्यास अशा व्यक्ती, इसम वा संस्थेने सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या मुदतीत आपला कायदेशीर हक्क व अधिकार कागदोपत्री पुराव्यानिशी रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.ने आमचेकडे सिध्द करावा.

अन्यथा अशी हरकत वर नमुद केलेल्या मुदतीत आम्हास न मिळाल्यास सदर जमीन मिळकतीच्या खरेदी–विक्री व्यवहारास कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत नसल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी–विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक रहाणार नाहीत, याची सर्वानी नोंद घ्यावी. म्हणून ही नोटीस प्रसिध्द केली आहे.

स्थळ : पनवेल.
तारीख : १८/०६/२०२६.

सही/–
**(सलिल अब्दुलरहमान नसिमा शेख)**
ॲडव्होकेट हायकोर्ट
०५, तळमजला, नित्यानंद कृपा सोसायटी, प्रभु आळी, मु.पो. ता. पनवेल, जि. रायगड मोबाईल नं.: ९८६९० ८७३९९



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमच्या अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मौजे बोनशेत, ता. पनवेल, जि.– रायगड येथील मिळकत**

| कब्जेदाराचे नाव | गट नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|
| गणेश बाळाराम फडके<br>रमेश बाळाराम फडके<br>भरत बाळाराम फडके<br>गंगुबाई मोहन पाटील<br>चंद्रकला चंद्रकांत भोईर<br>जयदास शांताराम म्हात्रे<br>सविता विष्णू गडकरी<br>धनवंती राम पाटील<br>आदिती अविष्कार मांडरे<br>सुनंदा मधुकर मुंबईकर<br>दत्तात्रेय महादू कालेकर<br>भगवान महादू कालेकर<br>सुजाता महादू कालेकर<br>दशरथ महादू कालेकर<br>भाग्यश्री जिवन म्हात्रे | ३/११ | १.३८.३० | १८.१४ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत समक्ष भेटुन पोहोचवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.

दिनांक १८/६/२०२६

सही/–
**ॲड. अपेक्षा दामोदर पाटील**
**पत्ता :** भुमी लँडमार्क, ५०७, सेक्टर १७, प्लॉट नं. ३४ / ३४ अ, क्रिया शोरूमच्या वरती, खांदा कॉलनी, न्यु पनवेल – ४१०२०६, मो. नं. ७२७६४३७८३७



### सौ. शंकुतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे

प्लॉट नं. २४०/२४१, से.२४, पुष्पक नोड, उलवे
ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ०२२–२७२१२०३१

**साहित्य खरेदी**

आमच्या शाळेसाठी खालील प्रमाणे साहित्य खरेदी करणे आहे. इच्छुक डिलरने कोटेशन दि. २५/०६/२०२६ पर्यंत जमा करावे.

| अ.नं. | तपशील | Qty |
|---|---|---|
| 1 | Dakin or Mitsubishi Company A.C. 1.5 ton (5 Star) | 6 |

दिनांक : १८/०६/२०२६

सही/–
**प्राचार्या**
सौ. शंकुतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. विजय कृष्णाजी पुसदेकर** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. विजय कृष्णाजी पुसदेकर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन–: **मौजे – डोलवी दबाबा** (553879)
**PU–ID : 21766525574** तालुका–पेण, जिल्हा–रायगड

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| 57 खाते क्रमांक – 404 | 2 | 0.28.60 पो.ख. 0.02.80 एकूण – **0–31–40** | 3.75 |
| या एकूण विक्री क्षेत्राचे **0–31–40** | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **14 दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुरावास आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक – 18/6/2026

सही/–
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**
बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०९
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१



**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. 1, पनवेल यांचे कार्यालय सिडको समाज मंदिर बिल्डिंग, पहिला मजला, बांठिया हायस्कूल जवळ, सेक्टर 18, नवीन पनवेल, ता. पनवेल जि.रायगड 410 206**
दुरध्वनी क्र. 022–27452590, फॅक्स क्र. 022–27452590, email :– dclamc1panvel@gmail.com

क्रमांक : भूसंपादन/कात – 1 / विरार अलिबाग बहु. मा / 2026 /1697 — दिनांक :– 17/06/2026

### महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, 1955 चे कलम 19 (ब) अन्वये भूसंपादनाचा मोबदला स्विकारण्याचा विकल्प / पर्याय देणेबाबत जाहीर नोटीस

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमधील तसेच रायगड जिल्ह्यातील वाहतुकीच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील विरार–अलिबाग बहुउद्देशिय महामार्ग प्रकल्प अर्थात राज्यमार्ग (विशेष) क्रमांक 4– करीता खालील तक्त्यात नमूद गावातील जमिनींच्या भूसंपादनाची महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, 1955 च्या कलम 15 (2) खालील अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. 12/08/2022 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त नमूद गावातील अधिसूचीत जमिनीच्या बाबतीत उक्त अधिनियमाच्या कलम 19 (ब) अन्वये जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समितीने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 चे कलम 26 ते 30 व अनुसूची–1 अन्वये दि. 12/03/2026 रोजीच्या बैठकीत मोबदला निर्धारीत करून दिला आहे.

त्याअर्थी, जे भूधारक दिलेल्या मुदतीत संमतीपत्र दाखल करतील व त्याबाबत संपादनाखालील जमीन निर्वेध व निर्जोखमी असल्याची भूसंपादन अधिकारी यांची खात्री पटवुन देतील त्यांना उपरोक्त नमूद अधिनियमातील तरतुदींप्रमाणे निर्धारीत मोबदला रक्कमेवर महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाचे कलम 19 (ब) (2) अन्वये अतिरिक्त 25 टक्के वाढीव मोबदला देण्यात येईल. तसेच जे भूधारक दिलेल्या मुदतीत संमतीपत्र व संमती करारनामा करून देणार नाहीत, त्यांना सदरचा अतिरिक्त 25 टक्के वाढीव मोबदला मिळणार नाही व अशा प्रकरणात भूसंपादन अधिकारी यांचेकडून महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाचे कलम 19 (ब)(3) अन्वये निवाडा घोषीत करून जमीन ताब्यात घेण्यात येईल. सदर संमती व विनासंमती मोबदला रक्कमेच्या तपशीलासहीत विकल्प देण्यासाठीची स्वतंत्ररित्या वयक्तीक नोटीसा संबंधीत क्षेत्राचे प्राधिकृत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. 1, पनवेल तथा सक्षम प्राधिकारी, विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका यांनी निर्गमित केल्या असून, सदर वैयक्तिक नोटीसा हितसंबंधितांनी संबंधित गावांचे तलाठी यांचेकडून प्राप्त करून घ्याव्यात.

तसेच असेही कळविण्यात येते की, नोटीसमध्ये नमूद मोबदल्याबाबत आपली संमती मौजे मोर्बे करीता दि. 25/06/2026 व मौजे वावंजे करीता दि. 07/07/2026 रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत संबंधीत क्षेत्राचे प्राधिकृत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. 1, पनवेल तथा सक्षम प्राधिकारी, विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका यांचे कार्यालयात सदर नोटीसीत नमूद कागदपत्रांसह संमतीपत्र सादर करावेत. वरील तारखेपर्यंत संमतीपत्र प्राप्त न झाल्यास आपली संमती नाही असे समजून अतिरिक्त 25 टक्के वाढीव मोबदल्याशिवाय कलम 19 (ब) (3) अन्वये भूसंपादनाचा निवाडा संबंधीत प्राधिकृत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. 1, पनवेल तथा सक्षम प्राधिकारी, विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका यांचेकडून घोषीत करण्यात येईल, याची हितसंबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : 17/06/2026

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|
| 1 | पनवेल | वावंजे |
| 2 | | मोर्बे |

सही/–
**(जनार्दन कासार)**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
मेट्रो सेंटर क्र. 1, पनवेल तथा
सक्षम प्राधिकारी,
विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका

जिमाका/रायगड/जाहिरात/४५/७३५/२०२६

# नवी मुंबई विमानतळावरून आंतरराष्ट्रीय उड्डाणे

## १५ जुलैचा मुहूर्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगातील सर्वांत सुंदर विमानतळांच्या यादीत नाव आल्यानंतर आता नवी मुंबई विमानतळाचा लवकरच विस्तार होणार आहे. नवी मुंबई विमानतळ परदेशभरारीसाठी काही काळापूर्वीच सज्ज झाले होते. त्यासाठी अखेर तारीख जाहीर झाली आहे. १५ जुलैपासून नवी मुंबई विमानतळावरून आंतरराष्ट्रीय प्रवाशांची आणि मालवाहतूक सुरू होणार आहे. यामुळे मुंबई महानगर प्रदेशात आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी आणखी एक पर्याय उपलब्ध होणार आहे.

नवी मुंबई विमानतळावर डिसेंबर २०२५मध्ये उड्डाणांना सुरुवात झाली. त्यानंतर हळूहळू विमानतळावर २४ तास सेवा सुरू करण्यात आली. आता प्रथम विमानतळावरून आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीला सुरुवात होणार असून नंतर हळूहळू ठरावीक प्रवासी उड्डाणे हाताळली जातील, अशी माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडचे सीईओ बी. व्ही. जे. के. शर्मा यांनी दिली आहे. मुंबईतील 'बीसीबीए लॉजिस्टिक कॉन्क्लेव्ह'च्यावेळी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. हळूहळू मालवाहतुकीच्या ऑपरेशन्समध्ये वाढ करण्याचे विमानतळाचे उद्दिष्ट आहे.



### ५ जुलैपर्यंत अधिसूचना करणार जारी

*या विस्तारासाठी अंतिम टप्प्यात तयारी सुरू आहे. सीमाशुल्क अधिकारी याची पाहणी करीत आहेत. सेंट्रल बोर्ड ऑफ इंडिरेक्ट टॅक्सेस अँड कस्टम्सने मंगळवारीच विमानतळाची पाहणी केली. आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी लागणाऱ्या महत्त्वाच्या अधिसूचना देण्यात आल्या आहेत. शेवटची पाहणीही नुकतीच सुरू होती. त्यानंतर चाचणी फेऱ्या सुरू होतील. ५ जुलैपर्यंत सीमाशुल्क अधिकारी ट्रेड नोटीस जारी करतील.*

### दुसऱ्या टर्मिनलचा विस्तार

*याशिवाय नवी मुंबई विमानतळावर दुसऱ्या टर्मिनलचा विस्तारसुद्धा होणार असल्याची माहिती शर्मा यांनी यावेळी दिली. यापूर्वी तयार केलेल्या योजनेत तीन कोटी प्रवासी हाताळण्याची क्षमता असलेले टर्मिनल उभारण्यात येणार होते. दरम्यान, आता आणखी मोठ्या टर्मिनलचा विचार सुरू असून पुन्हा आराखडा तयार केला जात आहे. पाच कोटी प्रवाशांना हाताळण्याची क्षमता असलेले टर्मिनल डिझाईन करण्यात येत आहे. त्यामुळे विकासालाही चालना मिळेल.*

१५ जुलैपासून विमानतळावरून आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीच्या उड्डाणांना सुरुवात होणार आहे. साप्ताहिक १८ विमान उड्डाणांचे त्यांचे लक्ष्य आहे. तसेच प्रवासी उड्डाणांसाठी हालचालीही सुरू आहेत. त्यामुळे १५ जुलैपर्यंत प्रवाशांसाठीही उड्डाणांना सुरुवात होण्यासाठी पावले उचलली जात आहेत. एअर इंडिया एक्स्प्रेस आणि इंडिगो या दोन विमान कंपन्या आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी आता विमानतळावर सेवा देतील, अशी माहितीदेखील त्यांनी यावेळी दिली. त्यामुळे पश्चिम भारतात हवाई वाहतुकीचे हे एक महत्त्वाचे ठिकाण बनणार आहे.

दरम्यान, नवी मुंबई विमानतळावर आता वाहतूक सुरू झाल्यापासून मुंबई विमानतळासाठी हा एक महत्त्वाचा पर्याय बनला आहे. दररोज येथून १५० उड्डाणे हाताळली जात असून सरासरी २०,००० प्रवासी प्रवास करतात. येत्या काही महिन्यांत जसजसा सेवांचा विस्तार होतो तशी प्रवाशांची संख्या वाढण्याचीही शक्यता आहे. वर्षाअखेरीस विमानतळावर दररोज ५०,००० प्रवासी हाताळण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच हवाई वाहतुकीची संख्या ३८०वर पोहचण्याची शक्यता आहे.

# मलेशियात नोकरीच्या नावाखाली खारघरमध्ये कोट्यवधींचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

विदेशात शिपिंग कंपनीत गलेलठ्ठ पगाराची नोकरी लावून देण्याचे स्वप्न दाखवत खारघरमधील एका खासगी कंपनीने शेकडो बेरोजगार तरुणांची तब्बल एक कोटी ७३ लाख ८१ हजार ४०० रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पैसे घेऊन कार्यालय बंद करून पसार झालेल्या या कंपनीविरोधात अखेर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून ऑल इंडिया सिफेरर्स युनियनने याप्रकरणी आक्रमक पवित्रा घेतला आहे.



खारघर सेक्टर ७ येथील अव्हॉन नेव्हिगॉर्झ मरीन्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने मलेशियासह इतर देशांमध्ये शिपिंग क्षेत्रात नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले होते. नोकरीसाठी सर्व्हिस चार्ज, व्हिसा प्रक्रिया, विमान तिकीट व इतर खर्चाच्या नावाखाली उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम उकळण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. बेरोजगार तरुणांनी कंपनीच्या प्रतिनिधींच्या सांगण्यावरून विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने पैसे जमा केले, मात्र पैसे भरल्यानंतरही नोकरी, व्हिसा किंवा परदेश प्रवासाबाबत कोणतीही ठोस माहिती देण्यात आली नाही. उलट संबंधितांनी उमेदवारांशी संपर्क टाळण्यास सुरुवात केली.

संशय आल्याने तरुणांनी खारघर येथील कार्यालयात धाव घेतली असता कार्यालयही बंद असल्याचे आढळले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित तरुणांनी आर्थिक गुन्हे शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा कट्टे यांच्याकडे धाव घेतली. याची गंभीरता लक्षात घेऊन त्यांनी तातडीने आपले पथक खारघर पोलीस ठाण्यात पाठवले. कंपनीविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणात कंपनीचे कथित मालक, व्यवस्थापक आणि इतर कर्मचाऱ्यांनी संगनमताने नोकरीच्या आमिषाने तरुणांकडून पैसे उकळल्याचा आरोप आहे.

पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत. ऑल इंडिया सिफेरर्स युनियनचे अध्यक्ष संजय पवार यांनी नवी मुंबईचे सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे यांना लेखी निवेदन देऊन संबंधित शिपिंग कंपनीविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# मोरबे धरण तळाला; नवी मुंबईत पाणीकपातीचा निर्णय

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जूनचा अर्धा महिना उलटल्यानंतरही समाधानकारक पाऊस न झाल्याने नवी मुंबईच्या जलनियोजनासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. मोरबे धरणातील उपलब्ध पाणीसाठा अधिक काळ पुरवण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने पाणीबचतीच्या उपाययोजना अधिक कडक करण्याचा निर्णय घेतला आहे.

पिण्याच्या पाण्याचा वापर केवळ अत्यावश्यक गरजांसाठी राखून ठेवण्यावर भर दिला आहे. वाहन धुलाई केंद्रांचा पाणीपुरवठा बंद करणे, व्यावसायिक आस्थापनांच्या पाणीपुरवठ्यात कपात, अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई आणि पर्यायी जलस्रोतांचा वापर वाढविणे अशा उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

यंदा मान्सूनच्या आगमनाला झालेला विलंब आणि राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना पिण्याच्या पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याच्या दिलेल्या सूचनांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने जलसाठ्यांचा आढावा घेतला आहे. उपलब्ध पाणी किमान ३१ ऑगस्टपर्यंत पुरेल यादृष्टीने नियोजन करण्यात येत असून नागरिकांनीही पाणी बचतीत सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

मोठ्या प्रमाणात पाणी वापरणाऱ्या व्यावसायिक आणि वाणिज्य आस्थापनांच्या पाणीपुरवठ्यात २० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पिण्याच्या



पाण्याचा गैरवापर आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. पाणीपुरवठा वाहिन्यांमधील गळती शोधून तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून अनधिकृत नळजोडण्या खंडित करण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.

पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी महापालिकेने शहरातील पर्यायी जलस्रोत कार्यान्वित करण्यावर भर दिला आहे. शहरातील १०० विहिरींची स्वच्छता, गाळ काढणे आणि दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली असून त्यांचा वापर पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी करण्याचे नियोजन आहे. तसेच १६६ कूपनलिकांची दुरुस्ती करण्यात आली असून काही ठिकाणी सार्वजनिक शौचालयांसाठी आणि काही झोपडपट्टी भागांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी त्यांचा वापर केला जात आहे.

दरम्यान, शहरातील ४४९ उद्याने, ट्री बेल्ट, चौक आणि सार्वजनिक मोकळ्या जागांमध्ये आधीपासूनच प्रक्रियाकृत पाण्याचा वापर केला जात आहे. आणखी १५४ उद्याने आणि सार्वजनिक जागांवरील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा बंद करून तेथे प्रक्रियाकृत पाणी वापरण्यात येणार आहे. बांधकामांसाठी देण्यात आलेल्या नळजोडण्या बंद करून केवळ प्रक्रियाकृत पाणी वापरण्याची सक्ती केली जाणार आहे. एनएमएमटी बस डेपोतील वाहन धुलाई, जलतरण तलाव, एरेटेड वॉटर आणि पॅकेज्ड वॉटर प्रकल्पांचा पाणीपुरवठाही बंद करण्यात येणार आहे.

सध्या नवी मुंबईत प्रतिमाणशी सुमारे २२० लिटर पाणीपुरवठा केला जातो. परिस्थिती कायम राहिल्यास तो १७५ लिटरपर्यंत कमी करण्याचा पर्याय प्रशासनाच्या विचाराधीन आहे. त्याचबरोबर सर्व शासकीय, निमशासकीय, निवासी आणि व्यावसायिक इमारतींसाठी पावसाच्या पाण्याची संकलन व्यवस्था बंधनकारक करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पाऊस आणखी लांबल्यास पाणीपुरवठ्यावर अतिरिक्त निर्बंध आणण्याची वेळ येऊ नये यासाठी महापालिकेने बचत, पुनर्वापर आणि पर्यायी स्रोतांच्या वापरावर भर दिला आहे. धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा होईपर्यंत या उपाययोजना कायम राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### गढूळ पाणी दूषित नाही!

**शहरातील काही भागांत गढूळ अथवा पिवळसर पाणी येत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्पष्टीकरण देताना पाणी दूषित नसून मोरबे धरणातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे खालच्या स्तरावरून पाणी उपसा करावा लागत असल्याचे सांगितले. धरणातील खालच्या स्तरावरील पाण्यात नैसर्गिकरीत्या आढळणारे लोह (आयर्न) आणि मॅगनीज घटक तुलनेने अधिक प्रमाणात असतात. या घटकांचा क्लोरीनशी संपर्क आल्याने काही भागांत पाण्याला पिवळसर छटा आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

# पनवेल तालुक्यात ३० जूनपासून एसआयआर मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन कार्यक्रम महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने संपूर्ण पनवेल तालुक्यात ३० जूनपासून ही मोहीम सुरू होणार आहे. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.



मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी बुधवारी फडके नाट्यगृहात १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व मतदार नोंदणी अधिकारी पवन चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात आली. या बैठकीस सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी मिनल भामरे, नानासाहेब कामठे, रमेश चव्हाण, संभाजी शेलार, समीर वाठारकर, मीडिया सेंटर समन्वयक रविकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त अभिषेक पराडकर, नायब तहसीलदार, महापालिका व महसूल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या मोहिमेंतर्गत ३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती पडताळणी करणार आहेत. या भेटीदरम्यान मतदारांना नाव, पत्ता, छायाचित्र तसेच इतर तपशिलांमध्ये आवश्यक बदल नोंदविण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच मतदार यादीतील मृत, स्थलांतरित किंवा डुप्लिकेट नोंदींची पडताळणी करून अशा नोंदींबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. यामुळे मतदार यादी अधिक विश्वासार्ह आणि त्रुटीमुक्त होण्यास मदत होईल.

या प्रक्रियेनंतर प्रारूप मतदार यादी ऑगस्टमध्ये प्रसिद्ध केली जाणार आहे. मसुदा यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांना दावे व हरकती नोंदविण्याची संधी दिली जाईल. सर्व दावे व हरकतींची छाननी पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदार यादी ऑक्टोबर २०२६ मध्ये प्रकाशित करण्यात येणार आहे, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी पवन चांडक यांनी दिली. या मोहिमेंतर्गत तयारी, प्रशिक्षण, छपाई, घरोघरी भेटी, मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण, प्रारूप मतदार याद्यांची प्रसिद्धी, दावे व हरकती दाखल करणे, नोटीस, दावे हरकती निकालात काढणे, अंतिम मतदार याद्यांची प्रसिद्धी करणे या सर्व विषयांबाबत या बैठकीत उपस्थित पर्यवेक्षकांना माहिती देण्यात आली.

विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकनाच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. या मोहिमेतून जी मतदार यादी तयार होईल ती अंतिम राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आपली नावे मतदार यादीत आहेत की नाही याची खात्री करून घेणे महत्त्वाचे आहे. प्रशासनाच्या वतीने सोसायटी अध्यक्ष तसेच सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, बीएलओ अधिकारी भेट देताना आवश्यक कागदपत्रांसह सहकार्य करावे व मतदार यादी अचूक करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा.

# रोजगार योजनेचा जागर

## पनवेल, डोलवीत आज जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेसंदर्भात कर्मचारी भविष्य निधी संघटना , क्षेत्रीय कार्यालय वाशी यांच्या वतीने शुक्रवारी (दि. १९) जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ४ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल तसेच जेएसडब्ल्यू स्टील्स, डोलवी, पेण येथे पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेची उद्दिष्टे आणि लाभांविषयी जनजागृती करणे हा आहे. यासोबतच नव्याने निवड झालेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्तिपत्रांचे वितरण करण्यात येणार असून उपलब्ध लाभांची माहिती दिली जाणार आहे. युवकांना रोजगाराच्या संधींबाबत प्रोत्साहित करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय स्तरावरील मुख्य कार्यक्रम नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित करण्यात येणार असून पनवेल व डोलवी येथील कार्यक्रमांत त्याचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात येणार आहे. क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त रामकृष्ण त्रिपाठी यांनी उद्योगसंस्था, नियोक्ते, कर्मचारी, लाभार्थी तसेच अन्य संबंधित प्रतिनिधींना कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. योजनेच्या अंमलबजावणीसाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. ही योजना औपचारिक रोजगाराला चालना देणे, कामगारांमधील सामाजिक सुरक्षा कवचाचा विस्तार करणे तसेच देशभरात रोजगार निर्मितीला बळकटी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे.

कार्यक्रमादरम्यान योजनेच्या विविध पैलूंवर सविस्तर माहिती दिली जाणार असून यामध्ये कर्मचारी व नियोक्त्यांसाठी लागू असलेले पात्रता निकष आणि विविध लाभ यांचा समावेश असेल.

# उरणमध्ये पावसाअभावी खरीप पेरण्या खोळंबल्या

**उरण : प्रतिनिधी**

शेतीच्या खरीप हंगामातील पेरणीपूर्व मशागतीची कामे उरकली असून शेतकरी पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. जून महिना मध्यावर आला असतानादेखील पेरणीयोग्य पाऊस पडत नसल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. तसेच भूजलसाठ्याने तळ गाठल्यामुळे विहिरी, बोअरवेल यांनाही पाणी नसल्याने नागरिक त्रस्त आहेत.



उरण परिसरात मोठ्या प्रमाणात औद्योगिक आणि नागरी विकास होत असून त्यासाठी जमिनी संपादित झाल्या आहेत. मात्र तरीही येथे २,५०० हेक्टरपेक्षा अधिक जमिनीवर भात पिकाची लागवड होते. तर तालुक्यातील अनेक ठिकाणी शिल्लक जमिनीही कसायला जात आहेत. मृग नक्षत्राची पेरणी खरीपासाठी उत्तम असते. त्यामुळे चांगला पाऊस मृग नक्षत्रात होईल, या आशेने शेतकऱ्यांनी महागडी बी-बियाणे, खतांची जमवाजमव केली. शेतीची मशागत केली, मात्र पाऊस होत नसल्यामुळे पेरणी करावी की नाही, असा प्रश्न उभा ठाकला आहे.

शेतकऱ्यांनी पेरणी केलीच, तर बियाणे वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. खाडीभागात शेतकऱ्यांनी धूळ वाफेवरच पेरणी करून घेतली आहे, मात्र पावसाचा असाच दडीचा खेळ सुरू राहिला, तर शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसेल. जून महिना निम्म्यावर आला असताना पावसाने दडी मारल्याने ग्रामीण भागातील भूजलसाठ्यांनी तळ गाठला आहे.

# उरणचे मीठागर : पांढऱ्या सोन्याची शतकांची कहाणी

रायगड जिल्ह्यातील उरण तालुका एकेकाळी 'मीठागरांचा प्रदेश' म्हणून ओळखला जायचा. जेएनपीटी, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या लाटेत अनेक पारंपरिक व्यवसाय मागे पडले, मात्र समुद्रकिनारी असलेल्या भेंडखळ, पिरकोन, दिघोडे, म्हातवली या गावांमध्ये आजही मीठ उत्पादनाचा पिढीजात व्यवसाय तग धरून आहे. याला स्थानिक भाषेत 'पांढरे सोने' म्हणतात आणि ते नाव सार्थ आहे. कारण शेकडो कुटुंबांची उपजीविका आजही या मिठावरच अवलंबून आहे.

मीठ बनवण्याची प्रक्रिया पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. ऑक्टोबर महिन्यात पावसाळा संपल्यावर मीठागरांची तयारी सुरू होते. समुद्रकिनारी असलेल्या जमिनीवर मोठमोठे वाफे तयार केले जातात. भरतीच्या वेळी समुद्राचे खारे पाणी कालव्यांद्वारे या



वाफ्यांमध्ये सोडले जाते. त्यानंतर सुरू होतो उन्हाचा खेळ. कडक उन्हात पाण्याची वाफ होऊन हळूहळू वाफ्यात मिठाचे स्फटिक जमा होऊ लागतात. सुमारे १५ ते २० दिवसांच्या प्रक्रियेनंतर एका वाफ्यातून मीठ गोळा केले जाते. याला 'मीठ काढणे' म्हणतात. डोक्यावर टोपली आणि हातात लाकडी फावडे घेऊन महिला आणि पुरुष उन्हातान्हात राबतात. हे काम कष्टाचे आहे पण त्यात एक लय आहे. एका हंगामात म्हणजे ऑक्टोबर ते मेपर्यंत एक मीठागर सुमारे ४०० ते ५०० टन मीठ उत्पादन करू शकते. उरणच्या मिठाला आयोडिन मिसळले जात नाही.

त्यामुळे ते थेट खाण्यासाठी वापरले जात नाही. मात्र लोणची, पापड, शेवया, मासे टिकवण्यासाठी आणि औद्योगिक वापरासाठी याला प्रचंड मागणी आहे. गुजरात आणि तामिळनाडूनंतर महाराष्ट्राचा मीठ उत्पादनात क्रमांक लागतो आणि त्यात उरणचा वाटा महत्त्वाचा आहे. पूर्वी उरणहून बोटीने मुंबईला मीठ पाठवले जायचे. आता ट्रकने ते संपूर्ण महाराष्ट्रात आणि गुजरातेतही जाते. पिढ्यानपिढ्या हा व्यवसाय करणाऱ्या आगरी आणि कोळी कुटुंबांसाठी मीठागर हीच ओळख आहे. पावसाळ्यात चार महिने मीठागर बंद असते. तेव्हा ही मंडळी मासेमारी किंवा इतर कामे करत असतात. हवामान बदलाचा फटकादेखील या व्यवसायाला बसत आहे. अवकाळी पाऊस आला तर तयार झालेले मीठ वाहून जाते आणि पूर्ण हंगाम वाया जातो. जागेचे भाव वाढल्याने अनेक मीठागरांच्या जमिनी आता बिल्डरांना विकल्या गेल्या आहेत. तरीही ज्या कुटुंबांनी ही परंपरा आजपर्यंत जपली आहे, त्यांच्यासाठी मीठ म्हणजे फक्त व्यवसाय नाही तर अस्मिता आहे. उन्हात चमकणारे मिठाचे ढीग दूरून बर्फाच्या टेकड्यांसारखे दिसतात.

**साभार : इंटरनेट**

# बोरघाटातील महाकाय दगड हटविला

## संभाव्य धोका टळला

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील मुंबई कडील बाजूस किमी ४१ आडोशी बोगदा जवळ धोकादायक स्थितीत असलेला मोठा दगड सुरक्षितपणे काढण्यात महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ व आयआरबीच्या पथकाला यश आले असून पावसाळ्यातील संभाव्य धोका टळला आहे.

बोरघाटातील आडोशी बोगदा व आसपासच्या परिसरात महाकाय दगड गोटे व दरड सदृश भला मोठा दगड आ वासून महामार्गावर कोसळण्याच्या स्थितीत असल्याचे आय आर बी कर्मचारी यांच्या चाणाक्ष नजरेत भरल्याने आगामी पावसाळ्यात संभाव्य गंभीर धोका टाळण्यासाठी यंत्रणा कामाला लागली. तर मुंबई कडे जाणारी वाहतूक रोखून धरण्यात आली. कर्मचारी व अधिकारी यांनी १ तास झुंज देत प्रसंगी धोकादायक कड्यावर जात कित्येक निष्पाप जीवाला धोका निर्माण होईल असा महाकाय दगड २०० फुट उंचावरून जमीनीवर लोटून देण्यात आला.



यावेळी बोरघाटातील वाहतूक ठप्प झाली होती. धोकादायक दगड व्यवस्थित पाडण्यात यश मिळाले असून उर्वरित दगड गोटे धोंडे व कचरा पालापाचोळा, माती सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आली असल्याने भविष्यातील धोका टळला आहे. या कामासाठी बोरघाटातील मुंबई बाजूकडील वाहतूक दोन तास रोखण्यात आली होती.

१९ जुलै २०१५रोजी याच परिसरात आडोशी बोगद्याच्या तोंडावर दुपारी १२ चे सुमारास महाकाय दरड कोसळून ८ वाहनांचे नुकसान झाले होते तर कार मधील ४जण जागीच ठार झाले तर २जण रुग्णालयात मृत्यू झाले तसेच१० जण जायबंदी झाले होते. अशीच घटना बोरघाटात मागील ४ वर्षी ३ वेळा घडली होती परंतु या घटनांमध्ये कोणत्याही प्रकारची जीवीतहानी वा मालमत्तेचे नुकसान झाले नव्हते

# सक्तीने वीज मीटर बसवण्यास खोपोली भाजपचा विरोध



## शिष्टमंडळाने दिले निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात काही दिवसापासून नवीन विद्युत मीटर बसविण्यासाठी विद्युत मंडळाकडून प्रयत्न सुरू आहेत, त्यामुळे खोपोली शहरात अनेक ठिकाणी विरोध होत आहेत, यामुळे कायदा संस्थेचा प्रश्न उभा राहू शकतो अशी चर्चा आहे, या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी खोपोली मंडळातर्फे शहराध्यक्ष अजय इंगुलकर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे शिष्टमंडळ अभियंता वाघमोडे यांना भेटले व सक्तीने वीज मीटर बसविणार असाल तर भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सर्वसामान्यांसाठी रस्त्यावर उतरणार असे शिष्टमंडळांनी अधिकाऱ्यांना खडसावले.

यावेळी शिष्टमंडळाने या विषयासंदर्भात सुमारे तासभर अधिकाऱ्यांची चर्चा करून नवीन मीटर बाबत जनसामान्यात तीव्र भावना आहेत असे सांगताना अजय इंगुलकर यांनी चर्चेदरम्यान संतप्त नागरिकांकडून तुम्ही सत्तेतील पक्ष असताना बघ्याची भूमिका का घेतात ?असा सवाल उपस्थित करीत असल्याचे सांगितले.

चर्चेदरम्यान खोपोली कार्यालयातील प्रमुख वाघमोडे यांनी नवीन वीज मीटर बाबत सांगताना सदरचे मीटर सर्वसामान्यांच्या फायद्याचे असल्याचे काही उदाहरणे देऊन त्यांनी सांगितले. याची माहिती ॲप द्वारे मिळणार असल्याचे सांगताना या मीटर मुळे विजेचे बिल जादा येईल हा मुद्दा त्यांनी खोडून काढला , शिष्टमंडळाततील अनेक सदस्यांनी वाघमोडे यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली ,त्याची उत्तरे वाघमोडे यांनी दिली. या शिष्टमंडळात शहराध्यक्ष अजय इंगुलकर सरचिटणीस विकास खुरपुडे, महिला उपाध्यक्ष अपर्णा साठे नगरसेविका प्रतीक्षा रेटेकर, सानिया शेख, परिवहन सभापती किशोर पाटील, संजय करंजकर मोरे, व इतर पदाधिकारी उपस्थित होते

सक्तीने वीज मीटर बसवू नका, वीज मीटर फॉल्टी असेल तर ग्राहकाच्या संमतीने वीज मीटर बदली करा असे शेवटी चर्चा दरम्यान शिष्ट मंडळांनी अधिकाऱ्यांना सांगितले. त्यानंतर वाघमोडे यांना शिष्टमंडळाने निवेदन दिले.

# नागोठण्यातील कानिफनाथ मंदिरात नवीन मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील मराठाआळी परिसरातील श्री कानिफनाथ मंदिरात नवीन देवमूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन दि. २१ व २२ जून २०२६रोजी करण्यात आले असून, या दोन दिवसीय धार्मिक सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. या पवित्र आणि मंगलमय कार्यक्रमात परिसरातील भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून देवदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

सोहळ्याची सुरुवात रविवार दि. २१ जून रोजी सायंकाळी 4 वाजता श्रीदेवांच्या मूर्तींच्या भव्य मिरवणुकीने होणार आहे. त्यानंतर धान्याधिवास, जलाधिवास, शय्याधिवास तसेच धर्मध्वज पूजन असे विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत.

सोमवार दि. २२ जून रोजी सकाळी द्वारपाल पूजन व मंदिर प्रवेश, विधान पूजन, महाअभिषेक, यज्ञकर्म आदी धार्मिक कार्यक्रमांनंतर सकाळी ११.३०वाजता नवीन देवमूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या सोहळ्याचे पौरोहित्य वेदोक्त पुरोहित श्री. शैलेश स्वामी व वेदोक्त आचार्य श्री. निखिल शास्त्री हे सहकाऱ्यांसह करणार आहेत.

यानंतर पूर्णाहुती, महाआरती, नवनाथांवरील प्रवचन, हरिपाठ, महाप्रसाद तसेच रात्री भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ह.भ.प. भगवान महाराज कदम सर यांचे प्रवचन तसेच गायक प्रफुल नागोठणेकर व तबला वादक कौस्तुभ दिवेकर व सहकारी यांचे श्री स्वामी समर्थ प्रासादिक भजन मंडळ, नागोठणे यांचे भजन हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

समस्त ग्रामस्थ व महिला मंडळ, मराठाआळी तसेच कंपनी विभाग नागोठणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# विद्यार्थी आणि पालकांनी मोबाईलचा गैरवापर टाळावा -पोलीस निरीक्षक पाटील



**रोहा : प्रतिनिधी**

अष्टमी उर्दू शाळेतून शिक्षण घेऊन अनेक माजी विद्यार्थ्यांनी उच्च पदापर्यंत झेप घेतली आहे. तुम्ही देखील उच्च शिक्षण घेऊन आपल्या शाळेचे आणि आपल्या गावचा नाव उज्वल करा. उच्च शिक्षण घेत यशाची पायरी चढण्यासाठी विद्यार्थी आणि पालक वर्गाने मोबाईलचा गैर वापर टाळावे असा मौलिक सल्ला देत इतरांसाठी सकारात्मक भूमिका बाळगा, देव तुमचा नक्कीच भलं करणार असे सांगत आपल्या कमाईतून काही भाग समाज सेवेसाठी अर्पण करणारे डॉ.फरीद चिमवकर यांचे कार्य देखील कौतुकास्पद असल्याचे मत रोहा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मारुती पाटील यांनी व्यक्त केले.

रोहा न.पा.च्या अष्टमी उर्दू शाळेतील गरीब गरजू विद्यार्थ्यांना डॉ.फरीद चिमावकर यांच्या यंग युनिटी वेल्फेअर असोसिएशन या संस्थेच्या वतीने शालेय दफ्तर व छत्र्या वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमा प्रसंगी पोलिस निरीक्षक मारुती पाटील, आयोजक डॉ.फरीद चिमावकर,मुस्लिम समाज अध्यक्ष म.शफी पानसरे,उपाध्यक्ष जमीर,उपाध्यक्ष मुबीन दळवी,डायमंड संस्थेचे अध्यक्ष समीर दर्जी,महिला पोलिस अधिकारी टेमकर मॅडम,पोलीस कर्मचारी सुनील सकपाळ,म.पोलिस कर्मचारी ललिता ढोरे,शरीफ मनजर,अ.रशीद डबीर,अजीम नाडकर, मुजीब दळवी,इम्रान टाटारे,समीर म्हैसकर, मुख्याद्यापिका जबीन वलिले शिक्षक व पालक वर्ग उपस्थित होते. शिक्षक वसीम सावरटकर यांनी सूत्रसंचालन तर परवेज अहमद यांनी आभार व्यक्त केले.

# सभापती कृष्णा पारंगे यांनी वावर्ले प्राथमिक आरोग्य केंद्राची केली पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी वावर्ले येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करून माहिती घेतली,आणि संबंधित यांना सूचना केल्या .

प्राथमिक आरोग्य केंद्र वावर्ले ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना मूलभूत वैद्यकीय सेवा पुरवणारे सर्वात महत्त्वाचे आरोग्य केंद्र आहे.वीस हजार लोकसंख्या या परिसरात आहे.हे आरोग्य केंद्र दुर्गम भागासाठी उपयुक्त येथील परिसर दुर्गम,डोंगराळ आणि आदिवासी बहुल आहे.हे आरोग्य केंद्र चौक कर्जत मार्गावर असल्याने त्याचा फायदा अपघातग्रस्त यांना ही होतो. हे केंद्र२४ तास असते.येथे बाह्यरुग्ण व आंतररुग्ण अशा दोन्ही सुविधा उपलब्ध आहे.

सभापती कृष्णा पारंगे यांनी सामान्य आजारांवर होणारे उपचार यांची माहिती घेतली. गरोदर महिलांची तपासणी, सुरक्षित बाळंतपण आणि बालकांचे लसीकरण या माहिती बरोबर हिवताप, टी.बी., कुष्ठरोग, आणि कर्करोग यांसारख्या आजारांची माहिती घेतली. शस्त्रक्रिया विभाग, प्रसूती विभाग, स्वच्छता गृहे यांची पाहणी करून परिसरातील स्वच्छता, पाणी पुरवठा,



वीज पुरवठा, सोलर पॅनल यांचीही पाहणी करून जनरेटर ठिकाणी शेड उभी करण्याचे निर्देश ग्राम पंचायत अधिकारी प्रवीण पेमारे यांना देऊन परिसरातील झाडेझुडपे यांची साफसफाई करण्याचे निर्देश दिले.

संपूर्ण परिसराची पाहणी करून आरोग्य केंद्राच्या स्वच्छतेविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी जे आवश्यक आहे त्यासाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन दिले. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याणी हिंगोले, आरोग्य अधिकारी डॉ.प्रसाद रोकडे,अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## माणगाव ग्रामीण पतसंस्थेचे लवकरच नवीन जागेत स्थलांतर

**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात रायगड जिल्हयात नावलौकिक कमाविलेल्या माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल ता.माणगांव या संस्थेचे कार्यालय सध्या चौधरी कॉम्प्लेक्स निजामपूर रोड,माणगाव याठिकाणी सुरु असून या पत आपल्या मालकी हक्काची नवीन प्रशस्त जागा माणगाव निजामपूर रोड मार्गावरील पटेल बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रस्तुत पटेल हेरिटेजमध्ये घेतली असून या जागेवर संस्थेने गुरुवार दि.१८ जून रोजी.चेअरमन,व्हाईस चेअरमन,संचालक मंडळ,हितिचंतक,व्यवस्थापक,कर्मचारीवृंद यांच्या उपस्थितीत ताबा घेतला. या नवीन जागेत लवकरच पतसंस्थेच्या कार्यालयाचे स्थलांतर होऊन कामकाजास सुरुवात होणार आहे.

# शाळा स्तरावरील मेळावा : आनंददायी अनुभव

बालकाच्या शिक्षणाला खरी सुरुवात ही बालकाच्या कुटुंबापासून होते. नकळत अनेक गोष्टी मग त्या संस्कारांशी संबंधित असतील, मूल्यांवर आधारित असतील किंवा मग त्याच्या बालमनावरील व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणाऱ्या स्वरूपात असतील. आपली आई, वडिल,बहिण,भाऊ,आजी, आजोबा, कुटुंबातील इतर सदस्य, शेजार या सामाजिक वातावरणात ते मूल वावरत असते आणि अनेक गोष्टी नकळतपणे शिकत असतो. जेव्हा मुल दाखल पात्र होते तेव्हा शाळेत जून महिन्यात प्रवेश घेऊन ते मुल शाळेत येते.



अचानक पदार्पण केलेल्या नवीन वातावरणात समरस होणे हे बालकाच्या बाल मनास तसे सोपे नसते. शाळेत आपल्याला सोडविण्यास आलेल्या आपल्या आईचा चेहरा न्याहाळत ते बरेच काही सांगत असते. मग आपल्याला शाळेत सोडून घरी जाणाऱ्या आईच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत बघत ते वर्गात बसते. नवीन शिक्षक, नवीन विद्यार्थी, नवीन परिसर हे सर्व काही बालकांना नवीन असते अशा वातावरणात शाळेची अभिरुची, अध्ययनाची आवड त्या बालकात निर्माण करणे हे शिक्षकांपुढे एक नवीन आव्हान असते.या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शाळापूर्व तयारी हा उपक्रम आम्हा शिक्षकांसाठी अत्यंत मोलाचा ठरला. बालकांना शाळेविषयी अभिरुची, नवीन अनुभवांची अनुभूती मिळण्यासाठी, मनातील काही भीती असेल तर ती दूर होण्यासाठी व्यवस्थित शाळापूर्व तयारी होणे अत्यंत गरजेचे आहे. या अभियानाचे फलित म्हणजे बालकांच्या क्षमता विकसित होण्यास मदत झाली. शारीरिक , सामाजिक, बौध्दिक, भाषा , गणन इत्यादी कौशल्य विकसित झाली.यामुळे पहिलित दाखल होण्यासाठी काहिच अडथळे आले नाहीत आणि पुढे ही बालके नक्कीच आत्मविश्वासपूर्वक अध्ययन करतील.

या अभियानात पालक, ग्रामपंचायत, अंगणवाडी, शाळा, स्वयंसेवक, यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. गुणवत्ता विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन आमच्या जिल्हा परिषद आदर्श शाळा-मजगाव,मराठी, तालुका-मुरुड, जिल्हा रायगड या शाळेत आम्ही सफलतापूर्वक शाळा पूर्वतयारी हा उपक्रम यशस्वी रित्या राबवला. या मेळाव्याचे आयोजन हा आम्हांला एक आनंददायी अनुभव ठरला आहे. आम्ही सर्व शिक्षकांनी इयत्ता पहिलीत दाखल होणारी मुले आणि त्यांच्या पालकांच्या गृहभेटी घेवून नोंद घेतली. शाळा पूर्वतयारी मेळाव्याचे महत्त्व, उद्देश पालकांना समजावून सांगितला. त्यांना मेळाव्याची माहिती दिली. शाळा स्तरावर आमचे अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत, अंगणवाडी यांच्या मदतीने शाळा स्तरावर शाळापूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन केले. मेळाव्याच्या दिवशी शाळेच्या प्रांगणात पाऊल ठेवणाऱ्या बालकांच्या चेहऱ्यावरील कुतूहल पाहून नक्कीच मनाला आनंद वाटला. कारण तो मेळावा खास त्यांच्यासाठी आयोजित केला होता. फुग्यांची सजावट, गुलाब पुष्पांचा वर्षाव, आकर्षक रंगिबेरंगी टोप्या,मनमोहक रांगोळी ,सेल्फी पॉईंट जणूकाही त्यांच्या स्वागतासाठी सज्ज होते. बालकांचे थाटामाटांत स्वागत केले. पालक, दाखल पात्र विद्यार्थी यांच्याच हस्ते पूर्वतयारी मेळाव्याचे उद्घाटन केले. कोणत्याही बालकांच्या मनावर कोठेही भीतीची मोहोरही उमटली नाही आणि पालकांचा आनंदही पाहण्यासारखा होता.सर्व दाखल पात्र विद्यार्थ्यांना गोड खाऊचे वाटप करण्यात आले .एक सुंदर आनंददायी अनुभव देणारा उपक्रम म्हणजे शाळा प्रवेशोत्सव.

**-रेश्मा धुमाळ**
**मुख्याध्यापिका,मजगाव ता.मुरूड**

# मजगाव आदर्श शाळेत विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात

**मुरुड : प्रतिनिधी**

आदर्श शाळा, मजगाव येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मुरूड पंचायत समितीचे सभापती निलेश जी घाटवळ यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, व टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. निलेशजी घाटवळ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत नियमित शिक्षण, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण अध्ययनाचे महत्त्व सांगितले. तसेच पालकांनी मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन केले तसेच विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या भेटीमुळे विद्यार्थी व शिक्षकवर्गाला नवी प्रेरणा मिळाली. शाळेच्या प्रगतीसाठी त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.त्यांच्या समवेत मुरुड गटाचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी ,प्रशासक प्रसाद माळी आणि साधन व्यक्ती चेतन पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापिका धुमाळ, शिक्षकवृंद बाळासाहेब फुंदे, स्वप्नाली बाजी, हर्षा नांदगावकर,संतोष दहातोंडे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चेतन चव्हाण यांनी केले.


जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७ / म.प्र - १, दि. १८/१०/२०२३

**परिशिष्ट - ३**

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड ई-मेल :-eerid२४@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७

**ई-निविदा सूचना क्र.१७ सन २०२६-२७**

**महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता. रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रु.लक्ष (GST Insurance & Rotalty धरुन) | इसारा/ रक्कम रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डोलवहाल बंधाऱ्याच्या उजव्या तीरावर मार्गदर्शक भिंतीचे बांधकाम करणे, ता. रोहा, जि. रायगड. | ४१८.०५/- | २,०९,०००/- | १२ महिने | रु. २०००/- +रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागू नाही |

**निविदा उपलब्ध कालावधी दि.१९/०६/२०२६ ते दि.२६/०६/२०२६**
**निविदा उघडण्याचा दि.२९/०६/२०२६**

खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि. १८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता :- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल : eerid२४@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई - निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.

**टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे.G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

**सही/-**
**(इंजि. राकेश धाकतोडे)**
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड

दिनांक : १८/०६/२०२६

क्रमांक : आरओसी २०२६-२७/क्र.-५/सी १२०२

## महिला एफआयएच हॉकी नेशन्स कप

# भारताची उपांत्य फेरीत धडक

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

महिला एफआयएच नेशन्स कप स्पर्धेत भारतीय संघाने आपली दमदार कामगिरी कायम ठेवली आहे. भारताने उरुग्वेचा ३–२ असा पराभव करत दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. टीम इंडियाची स्टार खेळाडू दीपिका या विजयाची शिल्पकार ठरली.



सामन्याच्या पहिल्या सत्रात (क्वार्टर) टीम इंडियाला काही अडचणींचा सामना करावा लागला. उरुग्वोने आक्रमक खेळ करत १३व्या मिनिटाला गोल डागला आणि १–० अशी आघाडी घेतली. या सुरुवातीच्या गोलमुळे भारतीय संघावर दडपण वाढले होते, मात्र भारतीय खेळाडूंनी संयम राखत आपले आक्रमण सुरूच ठेवले.

दुसऱ्या सत्रात भारताला बरोबरी साधण्याची संधी मिळाली. टीम इंडियाची आघाडीच्या (फॉरवर्ड) फळीतील दीपिकाने २४व्या मिनिटाला गोल करत स्कोअर १–१ असा बरोबरीत आणला. या गोलमुळे भारतीय खेळाडूंचा आत्मविश्वास वाढला आणि संघाने सामन्यावर आपली पकड मजबूत करण्यास सुरुवात केली.

तिसऱ्या सत्रात भारताने सामन्यात आघाडी घेतली. दीपिका सोरेंगने ४३व्या मिनिटाला एका उत्तम चालीचे गोलमध्ये रूपांतर करत संघाला २–१ने पुढे नेले. यानंतर भारतीय संघाने उरुग्वेवर सतत दबाव वाढवला आणि त्यांना पुनरागमन करण्याची फारशी संधी दिली नाही.

चौथ्या आणि अंतिम सत्रामध्ये हा सामना कमालीचा रोमांचक झाला. उरुग्वेच्या विल्लार मॅन्युएलाने ५५व्या मिनिटाला गोल करून स्कोअर २–२ असा बरोबरीत आणला. हा सामना आता ड्रॉ (बराबरी) होणार असे वाटत असतानाच भारताची स्टार खेळाडू दीपिकाने पुन्हा एकदा आपली जादू दाखवली. उरुग्वेने बरोबरी साधल्यानंतर अवघ्या एका मिनिटात दीपिकाने आणखी एक शानदार गोल करत भारताला ३–२ अशी विजयी आघाडी मिळवून दिली. अंतिम मिनिटांत भारतीय संघाने भक्कम बचाव करत उरुग्वेला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. सामना संपेपर्यंत भारताने आपली आघाडी कायम ठेवत महत्त्वपूर्ण विजय नोंदवला.

या विजयासह भारतीय महिला हॉकी संघाने ग्रुप स्टेजचा शेवट अव्वल स्थानावर केला आहे. सध्या संघाचा आत्मविश्वास उंचावला असून आता सेमीफायनल जिंकून फायनलमध्ये धडक मारण्याचे संघाचे लक्ष असेल भारतीय रणरागिणींचे लक्ष असेल.

# इंग्लंडची विजयी सलामी

## ■ क्रोएशियावर मात; हॅरी केनचा डबल धमाका

**डॅलस : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६मध्ये इंग्लंडने आपल्या मोहिमेची शानदार सुरुवात करत क्रोएशियाचा ४–२ अशा फरकाने पराभव केला. डॅलस स्टेडियमवर झालेल्या गट एलमधील या थरारक सामन्यात कर्णधार हॅरी केनने दोन गोल झळकावत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. दुसऱ्या हाफमध्ये ज्युड बेलिंगहॅम आणि मार्कस रॅशफोर्ड यांनी प्रत्येकी एक गोल करत इंग्लंडचा विजय निश्चित केला.



सामन्याच्या सुरुवातीपासूनच इंग्लंडने आक्रमक खेळ केला. हॅरी केनने पेनल्टीवर गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली, मात्र क्रोएशियाच्या मार्टिन बटुरिनाने बरोबरी साधत इंग्लंडला धक्का दिला. त्यानंतर केनने शानदार हेडरद्वारे पुन्हा एकदा इंग्लंडला आघाडी मिळवून दिली, पण पेटार मुसाने गोल करत क्रोएशियाला पुन्हा सामन्यात परत आणले आणि पहिला हाफ २–२ अशा बरोबरीत संपला.

दुसऱ्या हाफमध्ये मात्र इंग्लंडचा खेळ पूर्णपणे बदललेला दिसला. ज्युड बेलिंगहॅमने निर्णायक गोल करत इंग्लंडला ३–२ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर इंग्लंडने सातत्याने आक्रमण करत क्रोएशियाच्या बचावफळीवर दबाव कायम ठेवला.

सामन्याच्या ८६व्या मिनिटाला मार्कस रॅशफोर्डने गोल करत क्रोएशियाच्या पुनरागमनाच्या आशा संपुष्टात आणल्या. बुकायो साकाच्या अचूक पासवर रॅशफोर्डने बचावपटूला चकवून चेंडू जाळ्यात धाडला आणि इंग्लंडची आघाडी ४–२ अशी वाढवली. क्रोएशियाचा अनुभवी कर्णधार आणि पाचव्या विश्वचषकात खेळणारा लुका मॉड्रिक याने संघाचे नेतृत्व केले. हा त्याचा देशासाठीचा १९९ वा सामना होता, मात्र इंग्लंडच्या वेगवान आणि आक्रमक खेळापुढे क्रोएशियाला हार मानावी लागली.

या सामन्यात दोन्ही गोलरक्षकांनी उत्कृष्ट बचाव केले. इंग्लंडचा जॉर्डन पिकफर्ड आणि क्रोएशियाचा डॉमिनिक लिवाकोविच यांनी अनेक शानदार सेव्ह करत चाहत्यांना खिळवून ठेवले. विशेषतः लिवाकोविचच्या काही अप्रतिम बचावांमुळे इंग्लंडचा विजयाचा फरक आणखी मोठा होण्यापासून रोखला गेला. १९६६नंतर पहिल्या विश्वचषक विजेतेपदाच्या शोधात असलेल्या इंग्लंडसाठी हा विजय आत्मविश्वास वाढवणारा ठरला आहे.

# स्मृतीने मोडला आजी–माजी कर्णधारांचा विक्रम

## ■ टी–२० कारकिर्दीत झळकविले ३५वे अर्धशतक

**लीड्स : वृत्तसंस्था**

महिला टी–२० वर्ल्डकप स्पर्धेतील नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात भारताची सलामीवर बॅटर स्मृती मानधना हिने सलग दुसऱ्या अर्धशकासह खास विक्रमाला गवसणी घातली. स्मृतीने ४७ चेंडूत ११ चौकार व एक षटकाराच्या मदतीने ७४ धावांची दमदार खेळी केली. टी–२० कारकिर्दीतील ३५व्या अर्धशतकासह तिने माजी कर्णधार मिताली राजसह विद्यमान कर्णधार हरमनप्रीत कौरला मागे टाकले आहे.



स्मृतीने आपल्या सहाव्या वर्ल्डकप स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात टी–२० वर्ल्डकप स्पर्धेतील सहावी फिफ्टी प्लस खेळी साकारली. यासह तिने हरमनप्रीत कौर आणि मिताली राज यांना मागे टाकले. या दोघींनी टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत पाच वेळा ५०पेक्षा अधिक धावा केल्याचा रेकॉर्ड आहे. आंतरराष्ट्रीय टी–२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक ३६ फिफ्टी प्लसचा रेकॉर्ड आता स्मृतीच्या नावे आहे.

इंग्लंडच्या मैदानात स्मृतीची कामगिरी दमदार राहिली आहे, पण टी–२० वर्ल्डकप स्पर्धेआधी झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत ती अपयशी ठरली होती. सराव सामन्यातही तिच्या बॅटमधून धावा आल्या नाहीत, मात्र पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात तिने अर्धशतकी खेळीसह दमदार कमबॅक केले. आता नेदरलँडसविरुद्धच्या अर्धशतकासह तिने हंगाम गाजवण्यासाठी सज्ज आहे.

**दीप्तीची झुलन गोस्वामीशी बरोबरी**

नेदरलँड्सविरूद्ध झालेल्या सामन्यात दीप्ती शर्माने तीन षटकात २६ धावा खर्च करून एक विकेट घेतली. यासह तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३५५ गडी बाद करण्याचा पल्ला गाठला आहे. याचबरोबर दीप्तीने भारताची माजी गोलंदाज झुलन गोस्वामीच्या सर्वाधिक बळी टिपण्याच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. दोघींच्या नावे आता प्रत्येकी ३५५ विकेट्सची नोंद आहे.

## घानाचा पनामावर थरारक विजय

**टोरांटो : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात घानाने पनामावर १–० असा नाट्यमय विजय मिळवला. सामन्याच्या दुसऱ्या हाफच्या अतिरिक्त वेळेत (९५व्या मिनिटाला) कॅलेब यिरेंकीने केलेल्या एकमेव गोलने 'ब्लॅक स्टार्स'ला (घाना) स्पर्धेत विजयी सुरुवात करून दिली.

घानाचा महत्त्वाचा मिडफिल्डर थॉमस पार्टी या सामन्यात सहभागी होऊ शकला नाही. कायदेशीर प्रक्रियेमुळे त्याला कॅनडामध्ये प्रवेश नाकारण्यात आला होता. तरीही त्याच्या अनुपस्थितीत संघाने विजय मिळवला. या निकालामुळे गट 'एल'मध्ये घानाचे स्थान मजबूत झाले आहे.

# अजून सर्व काही संपलेले नाही -रोनाल्डो

**डॅलस : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६मधील आपल्या पहिल्याच सामन्यात पोर्तुगालला डीआर काँगोविरुद्ध १–१ अशी अनपेक्षित बरोबरी स्वीकारावी लागली, मात्र या निकालानंतरही पोर्तुगालचा कर्णधार आणि दिग्गज खेळाडू रोनाल्डो खचलेला दिसला नाही. सामन्यानंतर सोशल मीडियावर त्याने दिलेली प्रतिक्रिया आता इंटरनेटवर प्रचंड व्हायरल होत आहे.

रोनाल्डोने एक्सवर पोस्ट करत म्हटले, 'ही आमच्या अपेक्षेप्रमाणे सुरुवात नव्हती, पण अजून सर्व काही संपलेले नाही. डोकं वर ठेवा आणि पुढील सामन्यावर लक्ष केंद्रित करा.' त्याच्या या संदेशाने चाहत्यांमध्ये नव्या आशा निर्माण केल्या आहेत.



विश्वचषकातील पहिल्या सामन्यात रोनाल्डोचा प्रभाव फारसा दिसला नाही. संपूर्ण सामन्यात त्याने केवळ २५ वेळा चेंडूला स्पर्श केला. त्याने तीन शॉट्स मारण्याचा प्रयत्न केला, मात्र एकही शॉट लक्ष्यावर लागला नाही. तसेच त्याने फक्त एकच ड्युएल जिंकला. डीआर काँगोच्या बचावफळीने त्याला पूर्णपणे रोखून धरल्याचे चित्र दिसले. विशेष म्हणजे, विश्वचषकातील त्याच्या कारकिर्दीतील सर्वात कमी सहभाग असलेल्या सामन्यांपैकी हा एक सामना ठरला. विश्वचषकाच्या सुरुवातीच्या सामन्यात त्याच्या कारकिर्दीतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात कमी टचेस यावेळी नोंदवले गेले.

रोनाल्डोच्या कामगिरीबाबत चिंता वाढवणारी आणखी एक बाब म्हणजे मोठ्या स्पर्धांमध्ये त्याची गोलची प्रतीक्षा कायम आहे. आता तो सलग १० मोठ्या स्पर्धात्मक सामन्यांमध्ये गोल करण्यात अपयशी ठरला आहे. जगातील महान फुटबॉलपटूंपैकी एक मानल्या जाणाऱ्या रोनाल्डोसाठी ही नकोशी मालिका ठरत आहे.

१९७४नंतर प्रथमच विश्वचषकात सहभागी झालेल्या डीआर काँगोने बलाढ्य पोर्तुगालला रोखत एक महत्त्वपूर्ण गुण मिळवला. दुसरीकडे विश्वचषक विजेतेपदाचे दावेदार मानल्या जाणाऱ्या पोर्तुगालला पहिल्याच सामन्यात धक्का बसला आहे.

तरीही रोनाल्डोचा संदेश स्पष्ट आहे "अजून सर्व काही संपलेले नाही!" आता पोर्तुगाल पुढील सामन्यात विजय मिळवत पुनरागमन करण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे.

# महारेकॉर्डपासून रूट फक्त ४८ धावा दूर!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याचा महारेकॉर्ड मोडण्यापासून इंग्लंडचा स्टार फलंदाज आणि कर्णधार जो रूट फक्त काही धावा दूर आहे. कसोटी क्रिकेटमध्ये १४ हजार धावांचा टप्पा गाठण्यासाठी रूटला केवळ ४८ धावांची आवश्यकता आहे. हा टप्पा गाठताच तो कसोटी इतिहासातील सर्वात वेगाने १४ हजार धावा पूर्ण करणारा फलंदाज ठरेल.



सध्या रूटच्या नावावर १६४ कसोटी सामन्यात १३ हजार ९५२ धावा आहेत. त्यामुळे तो आपल्या १६५व्या कसोटीतच १४ हजारांचा टप्पा गाठू शकतो, तर सचिन तेंडुलकरने १७१ कसोटी सामन्यात १४ हजार धावा पूर्ण केल्या. रूटने हा टप्पा गाठल्यास सचिनचा अनेक वर्षांपासून कायम असलेला विक्रम मोडला जाईल.

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सचिनच्या नावावर अबाधित आहे. सचिनने आपल्या कसोटी कारकिर्दीत एकूण १५ हजार ९५१ धावा केल्या आहेत. यानंतर या यादीत जो रूट १३ हजार ९५३ धावांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा रिकी पाँटिंग (१३ हजार ३७८ धावा), जॅक कॅलिस (१३ हजार २८९ धावा) आणि राहुल द्रविड (१३ हजार २८८ धावा) अनुक्रमे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहे.

रूटसमोर आणखी एक मोठा विक्रम खुणावत आहे. कसोटी क्रिकेटमध्ये न्यूझीलंडविरुद्ध दोन हजार धावा करणारा जगातील पहिला फलंदाज बनण्याची संधी त्याच्याकडे आहे. २०१२मध्ये कसोटी पदार्पण केलेल्या रूटने न्यूझीलंडविरुद्ध २२ कसोटींमध्ये एक हजार ९३४ धावा केल्या आहेत. हा टप्पा गाठण्यासाठी त्याला आणखी ६६ धावांची गरज आहे तसेच सर्व फॉरमेटमध्ये न्यूझीलंडविरुद्ध रूटच्या नावावर ५४ सामन्यांत तीन हजार १०६ धावा आहेत. आणखी ६२ धावा केल्यास तो भारताचा स्टार विराट कोहली (तीन हजार १६७६ धावा) आणि रिकी पाँटिंग (तीन हजार १४५ धावा) यांना मागे टाकत न्यूझीलंडविरुद्ध सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर पोहचेल. या यादीत अव्वल स्थानावर अद्यापही सचिन तेंडुलकर आहे.

## 'हायड्रेशन ब्रेक' वादाच्या भोवऱ्यात

**अटलांटा : वृत्तसंस्था**

यंदाच्या फिफा विश्वचषकात फिफाने सुरू केलेल्या 'हायड्रेशन ब्रेक' (पाणी पिण्यासाठी विश्रांती) या नवीन प्रथेमुळे फुटबॉल वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. खेळाडूंच्या आरोग्यासाठी आणि उष्णतेचा सामना करण्यासाठी ही उपाययोजना असल्याचे फिफाचे म्हणणे असले, तरी या ब्रेकमुळे खेळाची लय बिघडत असून सामन्याची गती मंदावत असल्याचा आरोप दिग्गज खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून केला जात आहे.

फिफाने या विश्वचषकासाठी प्रत्येक हाफच्या २२व्या मिनिटाला तीन मिनिटांचा 'हायड्रेशन ब्रेक' अनिवार्य केला आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमधील उष्ण हवामानाचा विचार करता ही सोय करण्यात आली असली तरी, समीक्षकांच्या मते यामुळे केवळ खेळाडूंची लय तुटत नाही, तर प्रशिक्षकांना डावपेच आखण्यासाठी अनपेक्षित संधी मिळत आहे.

# काँगोसाठी ५२ वर्षांनंतर ऐतिहासिक गोल करणारा योहान विसा चर्चेत

**ह्युस्टन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेत पोर्तुगालविरुद्ध काँगोसाठी ५२ वर्षांनंतर ऐतिहासिक गोल करणारा योहान विसा सध्या चर्चेत आला आहे. २०२१मध्ये त्याच्यावर झालेल्या जीवघेण्या ॲसिड हल्ल्यानंतर दोन्ही डोळ्यांवर शस्त्रक्रिया करून त्याने फुटबॉलच्या मैदानात पुनरागमन केले. फ्रान्समध्ये जन्मलेल्या आणि ब्रेंटफोर्ड तसेच न्यूकॅसल यूनायटेडकडून खेळणाऱ्या विसाचा संघर्ष थक्क करणारा आहे.



फिफा वर्ल्डकप स्पर्धेत पोर्तुगाल आणि काँगो या दोन्ही संघांमध्ये झालेला सामना १–१ ने बरोबरीत राहिला. १९७४नंतर कांगोचा संघ पहिल्यांदाच फिफा वर्ल्डकप स्पर्धेसाठी पात्र ठरला. या सामन्यातील सहाव्या मिनिटाला पोर्तुगालच्या जाओ नेव्हेसने गोल करून पोर्तुगालला आघाडी मिळवून दिली, तर कांगोकडून योहान विसाने हेडरने गोल केला आणि काँगोला १–१ने बरोबरीत आणले.

योहान विसाचा जन्म ३ सप्टेंबरला फ्रान्समधील विलन्यूव्ह सेंट जॉर्जेस येथे झाला. इथूनच त्याने फुटबॉल खेळायला सुरुवात केली. २०२१मध्ये विसावर ॲसिड हल्ला झाला होता. एक महिन्यानंतर तो ब्रेंटफोर्डमध्ये दाखल झाला. या संघाकडून खेळताना चार हंगामात त्याने १४९ सामने खेळले आणि ४९ गोल केले. त्यानंतर तो न्यूकॅसल यूनायटेड संघाचा भाग बनला. या संघाकडून खेळताना त्याला गुडघ्याच्या दुखापतीचा सामना करावा लागला. प्रीमियर लीगमध्ये त्याला १३ सामने खेळण्याची संधी मिळाली. या दरम्यान त्याला एकच गोल करता आला. आता विसाने फिफा वर्ल्डकपमध्ये काँगोसाठी ऐतिहासिक गोल केला आहे.

# वैभव सूर्यवंशीने टिपला अफलातून झेल



**कोलंबो : वृत्तसंस्था**

श्रीलंकेत सुरू असलेल्या त्रिकोणी मालिकेत भारत अ संघाने अफगाणिस्तान अ संघावर १०१ धावांनी दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली, मात्र या सामन्यानंतर सर्वाधिक चर्चा झाली ती १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या एका अफलातून कॅचची.

आयपीएलमध्ये आक्रमक फलंदाजीमुळे चर्चेत आलेल्या वैभवच्या फिटनेस आणि क्षेत्ररक्षण क्षमतेवर काही दिवसांपासून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते, पण अफगाणिस्तान 'अ'विरुद्धच्या सामन्यात त्याने घेतलेल्या एका कॅचने सर्व टीकाकारांना मैदानावरच उत्तर दिले.

भारत अ संघाने प्रथम फलंदाजी करत ९ बाद ३१९ धावांचा डोंगर उभारला होता. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तान अ संघाचा डाव २१८ धावांत आटोपला. सामन्याचा खरा टर्निंग पॉइंट ठरला तो वैभव सूर्यवंशीने टिपलेला अविश्वसनीय झेल. अंशुल कंबोजच्या गोलंदाजीवर फलंदाज खालिद तनिवलने शॉट मारला चेंडू हवेत उंच गेला आणि उभ्या असलेल्या वैभवने क्षणाचाही विलंब न करता हवेत झेप घेत चेंडू आपल्या ताब्यात घेतला. त्याचा हा कॅच पाहून मैदानावरील खेळाडूंसह प्रेक्षकही थक्क झाले.

हा कॅच वैभवच्या फिटनेस आणि क्षेत्ररक्षणावर टीका करणाऱ्यांना दिलेले जोरदार प्रत्युत्तर होते. त्याची चपळता, अचूक टायमिंग आणि कमिटमेंट या कॅचमधून स्पष्टपणे दिसून आली. अंतिम फेरीपूर्वी वैभवचा हा सुपरमॅन झेल सोशल मीडियावरही व्हायरल झाला असून चाहत्यांकडून त्याचे कौतुक होत आहे.

# सिराज, वर्मा, रायडूला 'टीसीए'कडून नोटीस

**हैदराबाद** : भारतीय क्रिकेट संघातील स्टार खेळाडू मोहम्मद सिराज, तिलक वर्मा आणि माजी क्रिकेटपटू अंबाती रायुडू एका मोठ्या अडचणीत सापडले आहेत. टीजी २० लीगची नोंदणी झालेली नसतानाही सिराज, वर्मा आणि रायडूने त्याची जाहिरात केली. यानंतर तेलंगणा क्रिकेट असोसिएशन (टीसीए)ने तिघांनाही कायदेशीर नोटीस पाठवली आहे.



तेलंगणा क्रिकेट असोसिएशनकडे तेलंगणा टीजी २० लीगची नोंदणी झालेली नाही, मात्र तरीही या भारतीय क्रिकेटपटूंनी या लीगची जाहिरात आणि प्रमोशन केले. 'एएनआय'च्या रिपोर्टनुसार बीसीसीआयकडूनही या खेळाडूंना अशा प्रकारच्या कोणत्याही जाहिरातीसाठी परवानगी मिळाली नव्हती. बीसीसीआयच्या नियमांनुसार त्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही क्रिकेट लीगचे आयोजन करणे किंवा त्याचे प्रमोशन करणे हा नियमांचा भंग मानला जातो. या प्रकरणात केवळ क्रिकेटपटूच नाही, तर चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध कलाकारही अडकले आहेत. साऊथ फिल्म इंडस्ट्रीचे सुपरस्टार विजय देवरकोंडा आणि व्यंकटेश यांनीही या लीगचे प्रमोशन केले. त्यामुळे टीसीएने या दोन्ही अभिनेत्यांनाही नोटीस पाठवली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com